# प्रकरण - १

## रयत शिक्षण संस्था व महाविद्यालयाची पार्श्वभूमी

# प्रकरण पहिले

## रयत शिक्षण संस्था व महाविद्यालयाची पार्श्वभूमी

पिढ्यान पिढ्या बहुजन समाज शिक्षणाला वंचित होता. त्यामुळे तो सामाजिक विषमतेच्या आणि जातीभेदाच्या कर्दनात रूतून बसला होता. त्यामुळे ता चैतन्यहीन व आगतीक झाला होता. बहुजन समाजाचे अपमानित जीणे नष्ट करून त्यांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगता यावे यासाठी ज्यांनी आपले जीवन झिजविले त्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नांव अग्रक्रमाने घेतले जाते. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात ५० वर्षाहून अधिक काळ अविरत कार्य करून भाऊराव पाटील उर्फ आण्णांनी आपल्या स्वतःचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा सामाजिक आणि शैक्षणिक जीवनात उमटविला आहे. महात्मा जोतिबा फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांना गुरूस्थानी मानून त्यांचे अपुरे कार्य पूर्ण करण्याचा संकल्प आण्णांनी केला. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी ति. आण्णांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज रयत शिक्षण संस्थेच्या अनेक शाखा महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये आहेत. या शाखांमधून अनेक जातीधर्माची मुले शिक्षण घेत आहेत. रयत शिक्षण संस्था आणि ति. आण्णांची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवन -

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मूळ घराणे ऐतवडे असे सांगितले जाते. ऐतवडे (बुद्रुक) हे गाव सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात आहे. परंतु ऐतवडे हे त्यांच्या मूळ घराण्याचे गाव नसून मुडढीद्री हे त्यांच्या घराण्याचे गाव आहे. सद्याच्या कर्नाटक राज्यातील (पूर्वीचे म्हैसूर स्टेट) दक्षिण कन्नड जिल्हा तालुका मंगलोर येथे हे गाव आहे. मुडबीद्री हे जैन यात्रेकरूंचे प्रसिध्द ठिकाण आहे. या मुडबीद्री गावचे देसाई घराणे पुढे पाटील घराणे झाले.[१]

पायगोंडा पाटील यांना चार मुलगे व दोन मुली अशी सहा अपत्ये होते. पहिला मुलगा भाऊराव यांनी शिक्षणकार्यात ऐतिहासिक कार्य केले. दुसरा मुलगा तात्यासाहेब हे कोल्हापूर संस्थानमध्ये वकीली करू लागले. तिसरे बळवंतराव हे मॅट्रीक होऊन अबकारी खात्यात नोकरीस लागले. चौथे चिरंजीव बेडंद्र यांचे बेताचेच शिक्षण झाले. त्यांनी पोलिस खात्यात नोकरी केली. त्यावेळी मुलींना शिक्षण देत नसत. मुलींचे शिक्षण झाले नाही. एका मुलीचे नाव द्वारका, कोल्हापूरचे प्रसिध्द व्यापारी आदगोंडा पाटील यांच्याशी तिचे लग्न झाले. पायगोंडा पाटील यांचा असा परिवार होता.[२]

पायगोंडा पाटील अतिशय सज्जन, पापभिरू, सत्य अहिंसा व सदाचार यांचे आचरण करणारे, वृत्तीने पुरोगामी व उदार अंतकरणाचे होते. अशा प्रकारे भाऊराव पाटील याच्या कार्याला परंपरेने मिळालेला हा वारसा होता.[३]

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवन -**

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कुंभोज या गावी ता. २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. त्यांचे पूर्वज पिढ्यान पिढ्या शेती करत होते. त्यापैकी दोघांनी कोल्हापूरच्या जैनपीठाचे महारक पट्टाचार्य पदवी भूषविले होते. अशा पुनीत व सुसंस्कृत घराण्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म झाला.[४]

भाऊरावांच्या वडिलांना रोड कारकून म्हणून सातारा-पंढरपूर रस्त्यावरील पिलीव घाटात काम करावे लागले. झोपडी बांधून ते राहत असत. अत्यंत निर्जन उजाड असा तो घाट होता. या ओसाड घाटामध्ये भाऊरावांचे आई-वडिल दोघेच राहत होते. त्यावेही भाऊराव एक-दोन वर्षांचे होते. रात्री लांडगे येत, ते झोपड्यांना धडका मारीत, नख्यांनी झोपड्या ओरबाडीत असत. भाऊरावांच्या आई ही धीट होत्या. या सर्व गोष्टींचा संस्कार व वारसा म्हणून भाऊरावांच्या स्वभावामध्ये बेडरपणा आला.[५]

लहाणपणापासून भाऊराव बंडखोर होते. नोकरीच्या निमित्ताने त्यांना वडिलांबरोबर फिरावे लागे. वडिलांचा संबंध सर्वसामान्य थरातील लोकांशी येत असे. लोकांची गरीबी हालाखी, त्यांना पहावयास मिळे. समाजातील दु:ख पाहून त्यांना गहीवरून येई.

भाऊराव पाटील १२-१३ वर्षाचे असताना ते आजोबांकडे कुंभोजला गेले होते. आजोबांनी त्यांना एक चांगला कोट घालावयास दिला. तो कोट अंगात घालून भाऊराव ऐटित हिंडत होते. इतक्यात सिदू नावाचा एक सनदी महार आला. महाराच्या अंगावर चिंध्या झालेला अंगरखा होता. भाऊरावांनी ते पाहिलं आणि त्यांचे हृदय हेलावले. सिदू महार नको नको म्हणत असताना भाऊरावांनी आपल्या अंगावरचा कोट सिदू महाराला दिला.[६]

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यामध्ये अन्यायविरूध्द बंड करण्याची वृत्ती उपजतच होती. समाजामध्ये असणाऱ्या अनिष्ट प्रथा, परंपरा, स्पृश्यास्पृश्यता त्यांना लहानपणापासून मान्य नव्हती आणि लहाणपणापासून त्यांनी या व्यवस्थेला विरोध केला. गरीब पददलीत यांच्याबद्दल त्यांच्या मनामध्ये करूणा होती. भाऊरावांमध्ये लहाणपणापासून धाडस व सेवावृत्ती दिसून येते.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण -**

भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण विटे दहिवडी अशा वडिलांच्या बदलीच्या ठिकाणी झाले. विटे येथे दत्तोपंत जोशी या प्राथमिक शिक्षकाने खाजगी इंग्रजी पहिलीचा वर्ग चालविला होता. तेथे भाऊरावांचे इंग्रजी पहिलीचे शिक्षण झाले. त्यापुढील शिक्षणाची सोय विटे येथे नसल्याने भाऊराव शिक्षणासाठी कोल्हापूर येथे दाखल झाले.

कोल्हापूर ही ऐतिहासिक नगरी, पुरोगामित्वाचा झेंडा आखिल भारतात कोल्हापूरच्या

छत्रपती शाहूंनी फडकत ठेवला. छत्रपती शाहू पुरोगामी आणि समतेचे तत्त्व मानणारे एक समाजसुधारक अशी त्यांची प्रतिमा देशपातळीवर तयार झालेली होती. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. सर्व जातींच्या मुलांसाठी मोफत वसतिगृहे सुरू केली. वसतिगृहांसाठी मोफत दलिताकरिता नोकऱ्यांमध्ये आरक्षण ठेवले. मुलींना उच्च शिक्षण मोफत सुरू केले.

माझ्या राज्यातील प्रजा शिकली पाहिजे शिकूण शहाणी झली पाहिजे अशी त्यांची तळमळ होती. याकरीता त्यांनी प्रत्येक जातीजमातीकरीता मोफत वसतिगृहे सुरू केली होती. जातिनिहाय वसतिगृहे सुरू करण्यामध्ये दुसरा एक उद्देश असा होता की ज्या त्या समाजातील धनिकांनी पुढाकार घेऊन वसतिगृहास मदत करावी व आपल्या समाजातील अधिकाधिक मुलांनी शिकावे याकरीता प्रोत्साहन द्यावे.[७]

अशा पुरोगामी राजाच्या राजधानीत शिक्षण घेण्यासाठी भाऊराव आले. त्याकाळी प्रवासाच्या सोयी नव्हत्या. डोकीवर सामानाची वळकटी घेवून भाऊराव आणवाणी पायी निघाले. विटयाहून ८-१० मैल दूर असलेल्या कुंडल (किर्लोस्करवाडी) स्टेशनला आले. कोल्हापूर ते स्टेशन रेल्वेने प्रवास केला. कोल्हापूरच्या जैन वसतिगृहामध्ये भाऊरावांची मामांनी सोय केली होती.

भाऊरावांच्या इंग्रजी शिक्षणाची सुरूवात कोल्हापूर येथील प्रायव्हेट हायस्कूलमध्ये झाली. इंग्रजी दुसरी व तिसरीचे शिक्षण तेथे घेतले. पुढील शिक्षण राजाराम हायस्कूलमध्ये झाले. नाम. गोपाळराव गोखले, न्यायमुर्ती रानडे, भास्करराव जाधव, माधवराव बागल असे नामवंत समाजसुधारक व राजकारणी मंडळीचे शिक्षण या शाळेत झालेले आहे.

१९०२ मध्ये भाऊरावांनी राजाराम हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. १९०२ ते १९०७ हा भाऊरावांच्या कोल्हापूरमधील शैक्षणिक कालखंड होय.

भाऊराव पाटील शिक्षण घेत असताना वर्गातील सर्वांचे आवडते होते. भाऊरावांची वृत्ती खिलाडू होती. अभ्यासात मागे असले तरी कुस्ती, पोहणे, मल्लखांब अशा क्रिडाक्षेत्रात ते पटाईत होते. खेळाच्या स्पर्धात त्यांचा प्रथम क्रमांक असायचा. त्यामुळे भाऊरावांचा मित्रपरिवार वाढला. सरदार पाटणकर, बाळासाहेब कारखानीस, डॉ. चव्हाण, ओगले या बड्या आसामी त्याकाळी भाऊरावांचे जीवलग मित्र बनल्या होत्या.[८]

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या न्यायाने आण्णांच्या कार्यांची चिन्हे त्यांच्या विद्यार्थी दशेतील वृत्तीमधून व हालचालीमधून स्पष्ट होत होती. कोल्हापूर येथील जैन बोर्डींगमध्ये राहत असताना तेथील बुरसटलेल्या व प्रतिगामी स्वरूपाच्या नियमांविरूध्द बंड करून उठण्याचे धैर्य केवळ भाऊरावच दाखवू शकले. जेवतेवेळी सोवळे नेसले पाहिजे, दाढी करावयाची झाल्यास ती जेवणापूर्वी केली पाहिले असले नियम पाळणे हे आण्णांच्या स्वभावामध्ये नव्हते. विशेष म्हणजे कोल्हापूर येथे राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या मिस क्लार्क होस्टेलच्या उद्‌घाटन समारंभात हजर राहून परत आलेल्या भाऊरावांनी 'शुद्ध' होण्यासाठी स्नान करण्याचे नाकारल्यामुळे बोर्डींगच्या सुप्रीटेंडेंटनी त्यांच्या मते 'बेशिस्त वर्तन करणारी ही ब्याद एकदाची बोर्डींगच्या बाहेर काढून टाकली'. ज्ञानदेव घोलप या एका अस्पृश्य विद्यार्थ्याला घेवून ज्यानी आपल्या शिक्षणकार्याची मुहुर्तमेढ रोवली ते आण्णा स्पृश्य-अस्पृश्यता नियमांचे पालन करतील हे अशक्य होते. बोर्डींगमधून हकालपट्टी केल्यानंतर पुढे काय करावयाचे या विचारांनी भेडसावून जाण्यासारखे ते कच्च्या दिलाचे नव्हते. जैन बोर्डींगमधील वास्तव्याची अशारितीने इतिश्री झाली.[९]

इंग्रजी सहावी म्हणजे आत्ताची दहावी इयत्ता होय. सहावीत भाऊराव नापास झाले. भाऊराव वर्गात सर्व मुलांचे आवडते विद्यार्थी, उमद्या स्वभावाचा, मित्रवर्ग

मोठा. नापास झाल्यानंतर भाऊरावांना पास करण्याबद्दल मित्रांनी व खुद्द शाहू राजांनी वर्ग शिक्षक श्री भार्गवराम कुलकर्णी यांच्याकडे शिफारस केली. परंतु वर्ग शिक्षकांनी ती मान्य केली नाही.

फक्त इंग्रजी सहावी अशी शिक्षणाची शिदोरी असलेल्या या मुलाने शिक्षणक्षेत्रात केलेली मुलुखगिरी आश्चर्याने थक्क करणारी आहे. हाच मुलगा पुढे शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील बनला.[१०]

भाऊराव मुंबईला गेले. सेठ माणिकचंद पानाचंद यांनी भाऊरावांचे नाव दावर्स कॉलेज ऑफ कॉमर्स या खाजगी शिक्षण संस्थेत घातले. जैन वसतिगृहात राहण्याची, जेवण्याची सोय केली. परंतु भाऊरावांची शिक्षणात काही प्रगती झाली नाही आणि भाऊराव घरी परत आले.[११]

**रयत शिक्षण संस्थेची स्थापना -**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ज्योतीराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू व महात्मा गांधी यांना गुरूस्थानी मानले. त्यांचा समाजसेवेचा मंत्र स्विकारला. आडाणी जनतेस साक्षर, सुशिक्षित व सुसंस्कृत करण्याचा प्रयत्न केला. सुशिक्षित व जागृक जनता हीच खऱ्या लोकशाहीची जननी असते. या सदंर्भात कर्मवीर भाऊरावांच्या रचनात्मक, राष्ट्रसंवर्धक व शाश्वत कार्याचे महत्त्व इतिहासात केवळ असामान्य अतुलनीय असेच नोंदले जाईल.[१२]

कर्मवीर भाऊरावांच्या जीवनावर महात्मा फुले यांच्या प्रमाणेच राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा व विचारसरणीचा फार मोठा प्रभाव पडलेला आढळून येतो. महात्मा फुले यानी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे कार्य केवळ संस्थानातच नव्हे तर खानापूरपासून हुगळी-कोल्हापूरपर्यंत पसरविण्याचे महान कार्य राजर्षींनी

आपल्या अंगावर घेतले होते. तरूण भाऊरावांना राजर्षींच्या सान्निध्यात राहण्याची संधी त्याकाळात लाभली. या घटनेला भाऊरावांच्या जीवनामध्ये फार महत्त्वाचे स्थान आहे. बहुजन समाजाच्या अडीअडचणी व आशा आकांक्षाशी राजर्षी शाहू महाराज एकरूप झाले. बहुजन समाजाला मानसिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचे कार्य महात्मा फुल्यांनी सुरू केले. त्याच कार्याची पताका राजर्षींनी फडकत ठेवली. शिक्षणकार्य हाच समाजसुधारणांचा पाया आहे. हे वेळीच ओळखून राजर्षींनी कोल्हापूरात सर्व जाती जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी अनेक विद्यार्थी वसतिगृहे स्थापन केली. शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक कार्यामुळे भाऊरावांना फार मोठी प्रेरणा लाभली होती.[१३]

कर्मवीर भाऊराव पाटील किर्लोस्कर कारखान्यात सेल्स ऑर्गनायझर म्हणून काम करीत होते. तरी त्यांचे सत्यशोधक समाजाचे व सत्यशोधक समाजाच्या अनुषंगाने करीत असलेले शिक्षणाचे कार्य चालू होते. लक्ष्मणराव किर्लोस्कर यानाही हे माहीत होते. बाहेरचे सामाजिक कार्य करीत असूनही भाऊराव किर्लोस्कर कारखान्याचे काम सचोटीने व प्रमाणिकपणे करीत असत. दुधगाव, काले, नेर्ले ही सत्यशोधक चळवळीची केंद्रे होती. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांची ही गावे होती. भाऊराव नेहमी तेथे जात असत. गोरगरीबांच्या मुलांच्या शिक्षणाच्या प्रगतीसाठी एक संस्था असावी असे येथील कार्यकर्त्यांना व भाऊरावांना वाटू लागले.[१४]

मोहिते नावाच्या खेड्यातील एका हरीजन विद्यार्थ्याला घेवून भाऊरावांनी शिक्षणकार्याला सुरूवात केली. पिढ्यान पिढ्या ज्यांना विद्येच्या श्रीगणेशापासून वंचित ठेवलेले होते. अशा हरीजन मुलाला घेवून भाऊरावांनी आपल्या शिक्षणकार्याचा श्रीगणेशा केला. भाऊरावांनी सातारा हेच शहर आपल्या शिक्षणकार्याचे केंद्र म्हणून निवडले. भाऊरावांनी आपल्या शिक्षणकार्याची सुरवात यापूर्वी सातारा येथून केली

होती. भाऊरावांनी शिकवण्या घेवून साताऱ्यातील शिक्षणप्रेमी जनतेत नाव मिळविले होते. सातारा सत्यशोधक चळवळीचे केंद्र होते. सत्यशोधक समाजाच्या कामामुळे भाऊरावांना येथील प्रमुख मंडळी परिचयाची होती.

भाऊरावांचे वडिल पायगोंडा पाटील हे पूर्वी नोकरीच्या निमित्ताने साताऱ्यामध्ये राहत होते. १८४८ पर्यंत छत्रपती घराण्याचा वारसा सांभाळणारे सातारा शहर स्वातंत्र्योत्तर काळात जिल्ह्याचे ठिकाण बनले.[१५]

भाऊराव पाटील सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते होते. सर्व जाती जमातीच्या मुलांना एकत्रित घेवून त्यांचा अभ्यास करवून घेणे, पुस्तके, वह्या, शाई इ. लागेल ते शिक्षण साहित्य पुरविणे. त्यांच्या दिवा बत्तीची सोय करणे. मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे. त्याना व्यसनापासून मुक्त ठेवणे, त्यांच्यावर चांगले संस्कार करणे हा त्यांचा संस्था स्थापन्येमधील उद्देश होता. त्यांनी एक वसतिगृहही सुरू केले होते. भाऊसाहेब कुदळे, आप्पासाहेब पाटील, नाना येडेकर, श्यामगोंडा पाटील, शंकर कुदळे या मंडळींनी विशेष प्रयत्न केले. या संस्थेची मुळ जबाबदारी मादाण्णा मास्तर यांच्यावर सोपविलेली होती. मादाण्णा मास्तर हे प्राथमिक शिक्षक होते. या वसतिगृहात सर्व जातीधर्माची मिळून ५० मुले होती.[१६]

रयत शिक्षण संस्थेची मुहुर्तमेढ ५-९-१९१९ साली रोवली गेली. सत्यशोधक समाजाची मोठी परिषद काले या गावी भरली होती. काले हे कराड तालुक्यातील व सातारा जिल्ह्यातील गाव. काले येथील या परिषदेसाठी अनेक जिल्ह्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने आले होते. पुण्याचे नामवंत कायदेपंडीत व सत्यशोधक चळवळीचे खदे पुरस्कर्ते केशवराव बागडे हे या परिषदेचे अध्यक्ष होते. काले गाव हे उत्साही व उमदया सत्यशोधक कार्यकर्त्यांचे गाव म्हणून ओळखले जात होते. नारूकाका, दाजी पाटील, भाऊराव चौगुले इ. काले गावची प्रमुख कार्यकर्ते मंडळी होती. भाऊरावांनी

या परिषदेत आपले विचार प्रभावीपणे मांडले ते पुढीलप्रमाणे.[१७]

सत्यशोधक चळवळीची पूर्ती करायची असेल तर सर्व दुःखाचे मूळ अज्ञान आहे. हे अज्ञान घालवावयाचे असेल तर दीन, दलीत, बहुजन समाजातील मुलांना शिक्षण दिले पाहिजे. समाजातील सर्व थरामध्ये शिक्षण गेले पाहिजे हे राष्ट्रसंवर्धनाचे व संगोपणाचे काम आहे. बहुजन समाजातील सर्व मंडळींनी एकत्रीत येऊन हे काम केले पाहिजे. सत्यशोधक चळवळीचे हे पहिले काम आहे. म्हणून या ठिकाणी एका शिक्षण संस्थेची स्थापना केली पाहिजे." भाऊरावांनी उत्स्फुर्त असे विचार मांडले. भाऊरावांची कल्पना सर्वांनी उचलून धरली. याच परिषदेत शिक्षण संस्था स्थापन करण्याची घोषणा झाली. तसा ठरावही मंजूर झाला. संस्थेला नाव काय द्यावयाचे याबद्दल बराच खल झाला. शेतकरी म्हणजे 'रयत' रयतेला शिक्षण देण्यासाठी संस्था काढण्याचा विचार केंद्रस्थानी असल्यामुळे प्रस्तावीत शिक्षण संस्थेला 'रयत शिक्षण संस्था' असे नाव देण्याचे सर्वानुमते ठरले. बहुमताने हा ठराव मंजूर झाला. या संस्थेतर्फे प्रथम एक वसतिगृह सुरू करण्यात आले. वसतिगृहात प्रवेश घेण्याकरिता प्रवेश अर्ज, वसतिगृहातील नियम इ. साहित्य छापून घेतले.

संस्थेचा प्रथम अहवाल प्रसिद्ध झाला. अहवालामध्ये संस्थेने दिलेले उद्देश खालीलप्रमाणे नांदविले आहेत.

**संस्थेचे नांव - रयत शिक्षण संस्था, काले.**

४ ऑक्टोंबर १९१९ रोजी विजयादशमीच्या मुहुर्तावर रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली.[१८]

**संस्थेचे उद्देश -**

१. मागासलेल्या वर्गात शिक्षणाची अभिरूची उत्पन्न करणे.

२. मागासलेल्या जातीतील अत्यंत गरीब विद्यार्थ्यास शक्य तर मोफत शिक्षण देण्याचा प्रयत्न करणे.

३. सामान्य स्थितीतील विद्यार्थ्यास त्याच्या खर्चाने किंवा फारतर निम्म्या खर्चाने संस्थेत शिक्षण घेण्याकरिता ठेवणे.

४. ज्यांची सांपत्तीक स्थिती समाधानकारक आहे. अशा परगावच्या मागासलेल्या विद्यार्थ्यांची त्यांच्याच खर्चाने संस्थेत सोय करणे.

५. मागासलेल्या वर्गातील निरनिराळ्या जातीतील विद्यार्थ्यांमध्ये प्रेमभाव उत्पन्न करणे.

६. पूर्वकालीन अंधरूढीस फाटा देवून खऱ्या मार्गाचा अवलंब करण्याचे वळण देणे.

७. मिळून मिसळून वागण्यापासून संघशक्ती निर्माण होते तिचे महत्त्व कृतीने पटविणे.

८. मुले काटकसरी, स्वावलंबी, उद्योगी, उत्साही व शिलवान बनविण्याचा प्रयत्न करणे.

९. संस्थेचे शिक्षणाच्या बाबतीतील कार्यक्षेत्र वाढविणे.

संस्था सुरू करणे सोपे असते. परंतु सातत्याने चालविणे व ती टिकविणे अत्यंत अवघड व कठीण असते. भाऊराव किर्लोस्कर कारखान्यांमध्ये नोकरीस असल्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणे त्यांना जमेनासे झाले. त्यामुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला.

सुरवातीच्या काळात वसतिगृहाचा दैनंदिन खर्च भागविणे अवघड होते. दुधगाव, काले नेर्ले या ठिकाणी वसतिगृह सुरू केले. वसतिगृहाच्या मुलांची, जेवण्या-खाण्याची पुस्तके, वह्या, पाटी, दफ्तराची शैक्षणिक साहित्याच्या खर्चाची मोफत सोय करणे

आवश्यक होते. हे मोफत शिक्षणदानाचे काम सातत्याने चालले पाहिजे, खर्चाचे सातत्य राहिले पाहिजे व लोकांचा या कामात सहभाग व आत्मियता असली पाहिजे याकरीता भाऊरावांनी एक अभिनव योजना सुरू केली.[१९]

वसतिगृहातील सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातून आलेले होते त्यांच्याकडून पैशाच्या रूपाने वसतिगृहास देणगी मिळणे अवघड होते. पूर्वी पिठाच्या गिरण्या नव्हत्या, भल्या पहाटे उठून स्त्रीया घरीच दळण दळत असत. दळण्यापूर्वी वसतिगृहासाठी मूठभर धान्य काढून ठेवावयाचे अशी भाऊरावांनी योजना तयार केली. जात्यावर एक पिशवी टांगलेली असे. दळायला बाई जात्यावर बसली की सुपातले मूठभर धान्य त्या पिशवीत टाकावयाचे पिशवीत टाकलेले मूठभर धान्य एका आठवड्यातून घराघरातून गोळा करावयाचे हे काम विद्यार्थी करीत असत. भागातील प्रतिष्ठीत मंडळींनी या योजनेला चांगले सहकार्य केले.

भाऊरावांनी महाराष्ट्रभर शाळा व वसतिगृहे सुरू केली. सुगीच्या दिवसामध्ये शिक्षक व वसतिगृहातले विद्यार्थी खळ्यांवर जाऊन धान्य गोळा करीत असत. जमिनीचा सारा वसूल करताना शाळेकरीता देणगी गोळा केली जाई. ज्याच्या घरी लग्न साहेळा असेल त्याच्या घरी जाऊन देणगीची पावती फाडली जाई. लोकही खुषीने देणगी देत असत. भाऊरावांच्या कार्याबद्दल लोकांमध्ये जागृती व अत्मियता निर्माण झाली. सर्वत्र भाऊरावांचे कार्य पोहचले.[२०] भाऊरावांच्या शिक्षण कार्याचा प्रचार व प्रसार घरोघरी व्हावा व हा शिक्षणाचा यज्ञ अव्याहत सुरू रहावा हा या मागे उद्देश होता.

१९१९ साली रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली. कराड तालुक्यातील काले येथे एक वसतिगृह सुरू केले. काले गावाजवळ धेंडेवाडी गाव आहे. या गावामध्ये संस्थेने एक शिक्षकी शाळा सुरू केली. संस्थेची ही पहिली प्राथमिक शाळा होय. १९२१

साली या शाळेची नोंदणी झाली. या शाळेत ४८ विद्यार्थी होते. शिराज अहमद पिंजारी हा या शाळेत नाममात्र रक्कम स्विकारून शिक्षक म्हणून काम करीत होता. पिंजारी हा काले येथील संस्थेच्या वसतिगृहातील माजी विद्यार्थी होता.[२१]

रयत शिक्षण संस्थेने बोधचिन्ह वडाचे झाड हे आहे. हिंदू धर्मामध्ये वड, पिंपळ, उंबर ही झाडे पवित्र समजली जातात. यामध्ये ब्रम्हा, विष्णू, महेश यांचा वास आहे अशी श्रद्धा आहे.[२२] संस्थेच्या जीवनामध्ये धनिनीच्या बागेस ऐतिहासिक असे महत्त्व आहे. या बागेत प्रवेश केल्यावर प्रचंड असे वडाचे झाड होते. लांबून ते वडाचे झाड वाटे, परंतू त्यामध्ये अर्धा पिंपळ व अर्धा वड असे एकत्रित झाड होते. झाडाला दगडाचा पारकट्टा होता. तीनशे वर्षापूर्वीच्या प्रचंड अशा या झाडाच्या बुंध्याचा घेर ३०-३५ फुट असावा. याच्या असंख्य पारंब्या जमिनीला टेकलेल्या होत्या. सुरवातीला या झाडाखाली सर्व कार्यक्रम चालत असत. घरदार सोडून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे हे झाड म्हणजे आधारस्थान होते. संकटकालामध्ये या वृक्षाखाली बसल्यावर भाऊरावांना आधार वाटे. सर्वांचा हा आधार वड होता. नेहमी हिरवेगार वाटणाऱ्या या झाडाची फांदी दुसरीकडे लावल्यास तेथेही रोप वाढून झाड बनत असे. कोणाही पांथस्थाने या झाडाखाली येवून तृप्त व्हावे. म्हणून कर्मवीर भाऊराव नेहमी म्हणत, "वटवृक्षासारखी माझी संस्था आहे. संस्थेची कोठेही शाखा सुरू केली की ती वाढते" म्हणून भाऊरावांनी संस्थेचे बोधचिन्ह म्हणून वडाचे झाड निवडले.

वृक्षाचे महत्त्व खूप मोठे आहे. ऋषीमुनी या वृक्षाखाली बसून ध्यानधारणा करीत असत. गौतम बुद्धाला बोधीवृक्षाखाली ज्ञान प्राप्त झाले. "बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा गौतमाचा संदेश आहे. भाऊरावांनीही तोच संदेश स्विकारला. बुद्धांनी भिक्षू तयार केले, भाऊरावांनी ध्येयवादी 'आजीव सेवक' तयार केले. अनेकांना परदेशी पाठवून विद्याविभूषित करून आणले. अनेक सुधारकांना करता

आले नाही ते भाऊरावांनी केले. त्यांनी ध्येयवादी माणसे तयार केली. आजीव सेवक तयार केले व त्यांच्याद्वारे संस्थेच्या वटवृक्षाचा पसारा वाढविला.[२३]

सद्या रयत शिक्षण संस्था ही अशिया खंडातील सर्वात मोठी शैक्षणिक संस्था आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ज्या उद्देशाने या संस्थेची स्थापना केली तो उद्देश सफल झाला आहे. समाजातील सर्व जातीधर्माची मुले मुली रयत शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेत आहेत. रयत शिक्षण संस्थेच्या विकासाचा थोडक्यात आढावा पुढील मुद्यांवरून समजून येऊ शकेल.

**संस्थेची विकासात्मक वाढ -**

रयत शिक्षण संस्था शताब्दीकडे वाटचाल करीत आहे. सर्वांना शिक्षणाची समान संधी लाभली पाहिजे. ह्या ध्येयाने प्रेरीत होऊन जात, गोत, धर्म, पंथ इ. सामाजिक भेद नष्ट करून समता, बंधुत्त्व, मानवता ह्याकडे स्वावलंबनाने संस्थेची वाटचाल सुरू आहे. ती पुढीलप्रमाणे -

**१. वसतिगृहे -**

कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांनी वसतिगृहाच्या स्थापनेने संस्थेच्या कार्याला सुरवात केली. संस्थेच्या स्थापनेबरोबरच सन १९१९ मध्ये काले येथे पहिले वसतिगृह स्थापन करण्यात आले. १९२१ साली नेर्ले येथे वसतिगृह स्थापन केले होते. संस्थेच्या स्थापनेपूर्वीही कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक प्रयोग सुरू होते. शिक्षण संस्थेच्या स्थापनेपूर्वी सुमारे दहा वर्षे दुधगाव येथे वसतिगृह चालविले जात होते.

संस्थेने सातारा येथे १९२४ साली वसतिगृह सुरू केले. विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी १९३२ साली स्मृतीप्रित्यर्थ पुणे येथे युनियन बोर्डींग हाऊसची स्थापना केली. स्वातंत्र्यपूर्व काळातही ह्या सर्व वसतिगृहांमध्ये मागासलेल्या समाजातील

विद्यार्थ्यांसह आठरापगड जातीच्या विद्यार्थ्यांना एकत्र राहण्याचे, जेवण्याचे व काम करण्याचे धडे दिले. सद्या मुला, मुलींच्या ६८ वसतिगृहांमध्ये ही व्यवस्था आहे.

**२. शिक्षकांचे प्रशिक्षण -**

शाळेविना खेडे असू नये व प्रशिक्षित शिक्षकाविना शाळा असू नये ही डॉ. भाऊराव पाटील यांची धारणा होती. १९३५ साली सातारा येथे संस्थेतर्फे अध्यापक विद्यालयाची स्थापना केली ही संस्थेची पहिली शैक्षणिक शाखा होय. संस्थतर्फे सद्या एकूण ८ अध्यापक विद्यालये चालविली जातात.

**३. पूर्वप्राथमिक शिक्षण -**

पूर्व प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून सातारा येथे संस्थेने १९५४ पासून एक बालवाडी व एक बाल वसतिगृह चालविले. सद्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या मिळून संस्थेतर्फे एकूण १६ बालवाड्या चालविल्या जातात.

**४. प्राथमिक शिक्षण -**

धोंडेवाडी (ता. कराड, जि. सातारा) येथे संस्थेने १९१९ साली एक प्राथमिक शाळा चालविण्यास सुरवात केली. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने शाळा विरहीत खेड्यात संस्थेने १९३८ पासून व्हॅलेंटरी शाळा उघडण्यास सुरवात केली. अशा शाळांची संख्या ५७८ होती. स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनाने स्विकारल्यामुळे शिक्षकांसह या शाळा लोकल बोर्डाकडे सुपुर्द केल्या. सद्या संस्था २६ प्राथमिक शाळा चालविते. त्यामध्ये ५ शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत.

**५. माध्यमिक शाळा -**

१९४० मध्ये सातारा येथे महाराजा सयाजीराव विद्यालय या मोफत व निवासी

माध्यमिक शाळेची स्थापना करण्यात आली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९४८ साली महात्मा गांधी यांच्या स्मरणार्थ संस्थेतर्फे १०१ माध्यमिक विद्यालये सुरू करण्याची घोषणा केली. महाराष्ट्रातील १४ व कर्नाटकातील एक अशा दोन राज्यातील १५ जिल्ह्यात सद्या ४३६ माध्यमिक विद्यालये चालविली जात आहेत.

**६. उच्च माध्यमिक शिक्षण -**

महाराष्ट्र शासनाने १९७२ पासून १० + २ + ३ असा आकृतीबंध स्विकारला. त्यानुसार संस्थेच्या १६० माध्यमिक विद्यालयांमध्ये सध्या ११ वी व १२ वीचे वर्ग सुरू आहेत.

**७. उच्च शिक्षण -**

संस्थेने १९४७ मध्ये सातारा येथे छत्रपती शिवाजी कॉलेज या मोफत व निवासी कॉलेजची स्थापना केली. आर्टस्, सायन्स, कॉमर्स महाविद्यालये, प्रशिक्षण देणारी महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये व विधी महाविद्यालये मिळून सद्या संस्थेतर्फे ४० महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे.

**८. आश्रमशाळा -**

महाराष्ट्रातील आदिवासी भागामध्ये उपेक्षितांसाठी संस्थेने १९९१-९२ पासून आश्रमशाळा चालविण्यास सुरवात केली. सद्या संस्थेमध्ये ८ आश्रमशाळा आहेत.

**९. तांत्रिक शिक्षण -**

काही माध्यमिक विद्यालयामधून संस्थेने तांत्रिक शिक्षणाचे विभाग सुरू केले. आज संस्थेच्या २१ माध्यमिक विद्यालयातून वर्कशॉपसह परिपूर्ण तांत्रिक विभाग सुरू आहे. कनिष्ठ विभागात तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची सोय करण्यात आली आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR.

सातारा येथे १९८३ पासून अभियांत्रिकी महाविद्यालयाचे 'कर्मवीर भाऊराव पाटील' अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन असे नामकरण झाले. ह्या महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय आहे. सद्या संस्थेमार्फत दोन ठिकाणी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) चालविल्या जातात.

**१०. माहिती व तंत्रज्ञान -**

माहिती व तंत्रज्ञान ह्यांचे एकविसाव्या शतकातील महत्त्व ध्यानात घेऊन संस्थेने १९९६-९७ पासून ह्या क्षेत्रात पदार्पण केले आहे. संस्थेच्या माध्यमिक व काही महाविद्यालयात संगणक शिक्षण सुरू आहे. संस्थेने डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिटयूट ऑफ इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी हे संगणक शिक्षणकेंद्र १-२-१९९९ पासून सुरू केले. त्यामध्ये एम.एस.सी.आय.टी., एम.एस.ए.सी.आय.टी. व कोर्डक हे अभ्यासक्रम सुरू आहेत.

**११. स्त्री-शिक्षण** -

संस्थेच्या व्हॅलंटरी शाळापैकी काही शाळा फक्त मुलींसाठी चालविल्या जात होत्या. संस्थेचे पहिले अध्यक्ष हमीद अली यांच्या पत्नी सौ. बेगम यांनी भाऊराव पाटील यांच्या स्त्री शिक्षण कार्याला विशेष प्रोत्साहन दिले. आवश्यक अशा स्त्री शिक्षिका तयार करण्यासाठी संस्थेने १९४२ साली सातारा येथे जिजामाता अध्यापिका विद्यालयाची स्थापना केली. त्याचवर्षी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या स्मरणार्थ सातारा येथे मुलींचे वसतिगृह सुरू केले. डॉ. आंबेडकर यांच्या मातोश्री भिमाबाई आंबेडकर यांच्या स्मरणार्थ १९६० साली मुलींसाठी एक माध्यमिक विद्यालय सुरू करण्यात आले.

**१२. रयत प्रिंटीग प्रेस -**

१९८२ साली सातारा येथे रयत प्रिटींग प्रेस सुरू करण्यात आली. अहमदनगर येथे ही प्रिंटींग प्रेस सुरू आहे. या प्रेसमार्फत रयत शिक्षण संस्थेच्या कार्यालयांना व शाखांना लागणारे विविध प्रकारचे साहित्य छापून पुरविले जाते. तसेच संस्थेची नियतकालीके छापून दिली जातात.

**१३. वही व प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका निर्मिती -**

संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत ३ लाख प्रयोग वह्या व १२ लाख स्वाध्याय वह्या इ. ची दर्जेदार निर्मिती संस्थेच्या शिक्षकांकडून प्रथमच केली जात आहे. संस्थेतर्फे उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिक तयार केल्या जातात.

**१४. शैक्षणिक साहित्य उत्पादन केंद्र -**

संस्थेच्या शाखांना दर्जेदार व टिकाऊ फर्निचर कमीत कमी किंमतीत मिळावे यासाठी फर्निचर वर्कशॉप सुरू करण्यात आलेले आहे. या वर्कशॉपमध्ये शाखांच्या मागणीनुसार ड्युएल डेक्स, कपाटे, खुर्च्या, टेबल इ. साहित्य पुरविले जाते. सदर साहित्य बाजार भावापेक्षा कमी किंमतीत पुरविले जाते.

**१५. सहकारी तत्त्वावर चालविलेल्या संस्था -**

१. दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.

२. रयत सेवा को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स लिमिटेड आणि

३. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शिक्षणोत्तेजक सहकारी पतपेढी लिमिटेड ह्या सहकारी कायद्यानुसार नोंदविलेल्या संस्था आहेत.

**१६. सेवकांच्या सहकार्याने चालविलेल्या शाखा -**

१. रयत शिक्षण संस्था सेवक वेलफेअर फंड

२. रयत शिक्षण संस्था सेवक कुटुंब कल्याण योजना

**१७. कर्मवीर स्मृतीभवन -**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या अमूल्य कार्याचे स्फूर्तीदायी स्मरण भविष्यकालीन पिढ्यांना अखंडपणे रहावे या हेतूने कर्मवीर स्मृतीभवनाची उभारणी केलेली आहे. स्मृतीभवनाचे बांधकाम १९९४ साली पूर्ण झाले. ह्या स्मृती भवनात कर्मवीर आण्णांच्या रोजच्या वापरातील कपडे, खुर्ची, काठी, कपबशी, पेन, घोंगडी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी भेट म्हणून दिलेली मोटार इ. वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यांच्या जीवनकार्याची सामाजिक कालखंडाची तपशील व बारकावे टिपणारी असंख्य छायाचित्रे या भव्य व देखण्या वास्तूत प्रदर्शित करण्यात आलेली आहेत. स्मृतीभवनाच्या प्रांगणात कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई पाटील याचे पुर्णाकृती पुतळे उभे करण्यात आलेले आहेत.[२४]

**रयत शिक्षण संस्थेची सद्यस्थिती -**

संस्थेच्या कार्याचा विस्तार व विकास विशाल वटवृक्षाप्रमाणे झाला आहे. संख्यातमक व गुणात्मक प्रगती झालेली आहे. याचे श्रेय प्रामुख्याने संस्थेचे दृष्टे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील घालून दिलेल्या ध्येय धोरणे व कार्यपद्धती याना आहे. संस्थेचे हितचिंतक कार्यकर्ते, पदाधिकारी, शाखाप्रमुख, सेवक, विद्यार्थी या सर्वांचे सहकार्यही महत्त्वाचे आहे. सद्या रयत शिक्षण संस्थेच्या महाराष्ट्रात १४ व कर्नाटकात १ अशा १५ जिल्ह्यांमध्ये शाखा विस्तार आहे. रयत शिक्षण संस्थेच्या सद्यस्थितीबद्दल माहिती पुढीलप्रमाणे -

## विभागवार शाखा माहिती २००७-२००८

| शाखा प्रकार | मध्य विभाग | दक्षिण विभाग | उत्तर विभाग | पश्चिम विभाग | रायगड विभाग | एकूण[२५] |
|---|---|---|---|---|---|---|
| १. पूर्व प्राथमिक | ५ | २ | २ | ५ | ७ | २१ |
| २. प्राथमिक | ६ | २ | ७ | ६ | ५ | २६ |
| ३. माध्यमिक | १२९ | ८३ | १२३ | ६९ | ३५ | ४३९ |
| ४. अद्यापक विद्यालये | ३ | ३ | १ | - | १ | ८ |
| ५. महाविद्यालये | १९ | ७ | ७ | ४ | ४ | ४१ |
| ६. वसतिगृहे | २५ | ११ | २६ | ४ | २ | ६८ |
| ७. आश्रमशाळा | - | - | ३ | - | ५ | ८ |
| ८. औद्योगिक प्रशिक्षण संस्था | - | १ | - | - | १ | २ |
| ९. कार्यालये | २ | १ | १ | १ | १ | ७ |
| १० इतर शाखा | २७ | १३ | १२ | ५ | - | ५७ |
| एकूण | २१७ | १२३ | १८२ | ९४ | ६१ | ६७७ |

## विद्यार्थी वर्गवारी सन २००७-२००८[२६]

| प्रवर्ग | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| अनुसूचित जाती | ५१,८४७ |
| अनुसूचित जमाती | १५,५८९ |
| विमुक्त व भटक्या जमाती | ४८,४९९ |
| इतर मागासवर्गीय | ७९,१८३ |
| एकूण मागासवर्गीय | १,९५,११८ |
| बिगर मागासवर्गीय | २,२९,६०२ |
| एकूण | ४,२४,७२० |

**संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलींची माहिती पुढीलप्रमाणे -**

केवळ मुलींसाठी शैक्षणिक शाखा व मुलींची संख्या सन २००७-२००८.[२७]

| अ.नं. | शाखा प्रकार | शाखा संख्या | मुलींची संख्या |
|---|---|---|---|
| १. | प्राथमिक विद्यालये | १ | ७१८ |
| २. | माध्यमिक विद्यालये | २७ | २३,०२७ |
| ३. | ज्युनिअर विद्यालये | ५ | २,५१३ |
| ४. | अद्यापक विद्यालये | १ | ८० |
| ५. | महाविद्यालये | ४ | २,३०८ |
| ६. | इतर शाखा | १ | २२ |
| | एकूण | ३९ | २८,६६८ |

संमिश्र शैक्षणिक शाखांमधील मुलींची संख्या - १,६१,५९८

केवळ मुलींसाठीच्या शैक्षणिक शाखांमधील मुलींची संख्या - २८,६६८

संस्थेत शिक्षण घेणाऱ्या एकूण मुलींची संख्या - १,९०,२६६

**वसतिगृहातील एकूण विद्यार्थी**

| मागासलेल्या समाजातील | | कोट कमिटेड | | इतर | | एकूण[२८] | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली |
| २,३२२ | २६१ | ३८८ | १३० | ४२१ | ३०२ | ३,१३१ | ६९३ |

**शाखा प्रकारानुसार सेवक माहिती (२००७-२००८)**

| अ.नं. | शाखा प्रकार | स्त्रिया | पुरूष | एकूण[२९] |
|---|---|---|---|---|
| १. | महाविद्यालये | ४१३ | २,६३४ | ३,०४७ |
| २. | माध्यमिक विद्यालये | २,७४८ | १०,००५ | १२,७५३ |
| ३. | अध्यापक विद्यालये | २२ | ७२ | ९४ |
| ४. | प्राथमिक विद्यालये | १५६ | ७० | २२६ |
| ५. | पूर्व प्राथमिक विद्यालये | ४९ | २ | ५१ |
| ६. | वसतिगृहे | ७ | ३३ | ४० |
| ७. | कार्यालये | १० | १५४ | १६४ |
| ८. | आश्रमशाळा | ४२ | १२३ | १६५ |
| ९. | आय.टी.आय. | - | १७ | १७ |
| | एकूण सेवक | ३,४४७ | १३,११० | १६,५५७ |

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचा मृत्यू -**

भाऊरावांचे शरीर थकलेले होते. अशा अवस्थेतही भाऊरावांची धडपड चालू

असायची. स्वस्थ पडून राहण्याचा व विश्रांती घेण्याचा स्वभाव भाऊरावांचा नव्हता. म्हणून त्यांना ससून रूग्णालयात ठेवण्यात आले होते. संस्थेचा व्याप प्रचंड वाढलेला होता. भाऊरावांना भेटण्यासाठी माणसांची सारखी रीघ लागलेली असायची. कोणीही भेटू नये अशी डॉक्टराची तांकीद होती. तरीही लोक भाऊरावांना भेटत असत. "मला लोकांना भेटू द्या म्हणजे माझा आजार कमी होईल" असे भाऊराव म्हणत असत. शनिवार हा भाऊरावांचा घातवार होता. असेच म्हणाले लागेल. भाऊरावांची प्रकृती शनिवारीच बिघडत असे. ८ नोव्हेंबर, २४ नोव्हेंबर, ४ एप्रिल, १८ एप्रिल यादिवशी भाऊरावांची प्रकृती बिघडली. त्या तारखेचे वार शनिवारच होते. त्यांना ऑक्सिजनवर याच तारखांना ठेवले होते.[३०]

९ मे १९५९ हा वारही शनिवारच होता. आदल्या रात्री म्हणजे ८ मे रोजी भाऊरावांनी मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांना पत्र लिहले होते. भाऊरावांना लघवीचा विकार जडला होता. डॉक्टरांच्या अथक प्रयत्नानंतरही प्रकृतीला आराम न पडता ९ मे १९५९ या दिवशी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची प्राणज्योत मावळली.

भाऊरावांचे मानसपुत्र संस्थेचे आजीव सदस्य इंग्रजी साहित्याचे गाढे विद्वान आणि शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू बॅ. पी.जी. पाटील भाऊरावांच्या मृत्युबद्दल लिहतात "दलितांचा राजा गेला. गोरगरीबांचा वाली गेला. महाराष्ट्राचा ज्ञानेश्वर समाधिस्त झाला. बहुजन समाजाचा व उध्दारकर्ता गेला. सातारचा वटवृक्ष उन्मळून पडला व त्यावरील पाखरे निराधार झाली."[३१]

१९५५ मध्ये रशियन नेते क्रुश्चेव्ह व बुलगानीन हे भारत भेटीवर आले असता मुंबईला कर्मवीरांची त्यांच्याशी भेट झाली होती. कर्मवीरांच्या कार्याचे त्यानी कौतुक केले होते. त्यानी रशिया भेटीचे निमंत्रण आण्णांना दिले. कामाच्या व्यापामुळे व

आजारपणामुळे आण्णा परदेशी जावू शकले नाहीत. २६ जानेवारी १९५९ राजी भारत सरकारने आण्णांना पद्मभूषण हा किताब देवून गौरविले. ५ एप्रिल १९५९ रोजी पुणे विद्यापीठाने आण्णांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल 'डी. लिट्.' ही पदवी देवून गौरव केला. सर्व जनतेने त्याना 'कर्मवीर' ही उपाधी दिली होती. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील हे शिक्षण महर्षी होते. खऱ्या अर्थाने शिक्षण तिर्थंकार होते.[३२]

कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षणासाठी काही काळ कोल्हापूरमध्ये वास्तव्यात होते. ज्या करवीर नगरीत राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सान्निध्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या वैचारीक जीवनाची जडणघडण झाली. त्या करवीर नगरीत राजर्षी शाहू महाराजांमुळे भाऊराव पाटील यांना शिक्षण कार्याची प्रेरणा मिळाली. त्या करवीर नगरीत राजर्षींच्या नावे रयत शिक्षण संस्थेची एखादी शाखा एखादे महाविद्यालय सुरू करावे व राजर्षींचे ऋण फेडावे अशी आण्णांची इच्छा होती, स्वप्न होते. कर्मवीरांचे हे स्वप्न १९६७ साली साकार होण्याचा योग आला. पूर्वीचे किर्ती कॉलेज रयत शिक्षण संस्थेने घेतले. १९६९ साली किर्ती कॉलेजचे "राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय" असे नामकरण केले. अशा रितीने कर्मवीर भाऊराव पाटील यांचे स्वप्न साकार झाले. या कॉलेजमुळे खेड्यापाड्यातील गोरगरीब, पद्दलीत शोषित, पिडीत अनाथ शहरातील हुशार व होतकरू मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय झाली.[३३]

किर्ती कॉलेजच्या स्थापने दरम्यानच्या काळातील कोल्हापूरमधील शैक्षणिक, सामाजिक परिस्थिती कशी होती. शाहू महाराजांचे कोल्हापूरमधील शैक्षणिक कार्य याबद्दल थोडक्यात आढावा आपल्याला पुढीलप्रमाणे घेता येईल.

**कोल्हापूरचे भौगोलिक स्थान -**

आधुनिक काळातील महाराष्ट्र राज्यामध्ये कोल्हापूर शहर हे महत्त्वाचे शहर आहे. या शहराच्या विकासाचा भक्कम पाया छत्रपती शाहू महाराजांच्या काळामध्ये घातला गेला. २० व्या शतकाच्या प्रारंभी कोल्हापूर संस्थानचे राजे छत्रपती शाहू महाराज यांनी जाणीवपूर्वक शहराच्या औद्योगिक व व्यापारीकरणाच्या विकासासाठी प्रयत्न केले. त्यांच्या अथक परिश्रमाचे परिणाम म्हणजेच उद्योगधंदे, वाणिज्य, व्यापारी, सहकारी संस्था, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था हळूहळू विकासाकडे वाटचाल करू लागल्या.[३४]

प्राचीन काळापासून कोल्हापूर शहराला ऐतिहासिक महत्त्व आहे. हे शहर १६° ते ४२ उत्तर रेखांश आणि ७४°-१४ पूर्व अक्षांश मध्ये स्थित आहे. १९४९ पर्यंत कोल्हापूर हे कोल्हापूर संस्थानची राजधानी होती. समुद्रसपाटी पासून १७९० फुटावर हे शहर वसलेले आहे. पंचगंगा नदीच्या दक्षिण पात्रापासून अर्धा मैलावर आहे. १९४९ पासून हे शहर कोल्हापूर जिल्ह्याचे केंद्र बनले. कोकण किनारपट्टीपासून ६४ मैल दूर तर दक्षिण सातान्यापासून ७६ मैल दूर आहे व उत्तर बेळगांवपासून ६६ मैल दूर आहे. १९४६ पूर्वी या शहराचा भूभाग कमीत कमी म्हणजेच ६७ चौरस मैल इतका होता. पुढे हे क्षेत्र वाढविण्यात आले.[३५]

हे शहर सह्याद्री डोंगररांगांच्या पूर्वेस वसलेले आहे. सह्याद्रीच्या विशालगड व पन्हाळगड रांगांच्या उत्तरेस हे शहर स्थित असून पंचगंगा व वारणा नदीच्या खोऱ्यात विसावलेले आहे. शहराच्या दक्षिणेस फोंडा, सावगाव रांगा आहेत. सह्याद्रीच्या उंच पर्वतरांगा शहराच्या पश्चिमेस असल्यामुळे पंचगंगेचे खोरे तीनही बाजूंनी पर्वतरांगांनी वेढलेले आहे. हा भाग बऱ्याच घाटांच्या सहाय्याने कोकणाशी जोडलेला आहे.[३६]

१९४९ पूर्वी हे शहर इथल्या अनेक छोट्या मोठ्या तलवांसाठी प्रसिद्ध होते. १८८५ मध्ये रंकाळा तलावा व्यतिरिक्त शहराच्या उत्तर-पूर्वेला महार तळे, तर दक्षिण-पूर्वेला पद्मालय तळे आणि दक्षिणेत फिरंगाई व वरूणतीर्थ तळे आहे. शहराच्या पश्चिमेस खंबाळा व कुंभार तळे होते. पुढील काळात यापैकी बरेचशे तलाव मुजविण्यात आले आणि १९४९ मध्ये कोटीतीर्थ व रंकाळा हे दोनच तलाव अस्तीत्त्वात राहिले.[३७]

कोल्हापूर हे शहर पश्चिम भारतातील अतिप्राचीन शहरांपैकी एक आहे. दोन हजार वर्षापूर्वी ब्रह्मपूरी नावाची संस्कृती पंचगंगा नदीच्या तीरावरती वसत असे. प्राचीन दंतकथेत असे संबोधले आहे की, या विश्वाचा निर्माता ब्रह्मा यानी स्वतःहून ही संस्कृती निर्माण केली. शहराच्या दक्षिण-पश्चिम दिशेस पन्हाळा टेकडीला ब्रह्मगिरी म्हणून ओळखले जात असे.

या शहराचा उल्लेख पुराणामध्ये कुरवी (Kurwee) (करवीरा - Karveera) असा आहे. देवी महालक्ष्मीने आपल्या हातांनी महापुराच्या पाण्यातून प्रिय भक्तांना वाचविले अशी यामागील दंतकथा आहे.

आणखी एक दंतकथा अशी आहे की शहराच्या आसपास कोल्हा नावाचा राक्षस राहतअसे. महालक्ष्मीने त्याच्याशी युद्ध करून त्यास ठार केले. तेव्हापासून या शहरास कोल्हापूर असे नाव देण्यात आले.[३८]

कोल्हापूर या भागावर सातवाहन, चालुक्य, शिलहार, यादव, बहामनी, मराठा या राजवटी राज्य करीत होत्या.

शिवाजी राजांनी १६५९ साली पन्हाळा गड जिंकला तेव्हापासून कोल्हापूर व आसपासच्या भागावर त्यांचे राज्ये होते. इ.स. १७१० साली पन्हाळ्यावर छत्रपती

राजाराम यांच्या पत्नी राणी ताराबाई यांनी मराठी सत्तेची दुसरी शाखा स्थापन केली. तेव्हापासून पूर्वी पेक्षा जास्त महत्त्व या शहारास प्राप्त झाले. १७८२ साली कोल्हपूर संस्थानचे दुसरे राजे शिवाजी (दुसरे) यांनी आपली राजधानी पन्हाळ्यातून कोल्हापूर येथे स्थलांतरीत केली आणि तेव्हापासून कोल्हापूरचे महत्त्व वाढले.

शिवाजी (दुसरे) यांच्या मृत्युनंतर १८१२ मध्ये त्यांचे थोरले चिरंजीव शंभू उर्फ आबासाहेब महाराज हे राज्य करू लागले.

२ जुलै १८२१ साली छत्रपती शंभू महाराज यांचा खून करून त्यांचेच धाकटे बंधू शहाजी उर्फ बुवासाहेब महाराज यांनी राजगादी हस्तगत केली. १८३७ मध्ये शिवाजी (चौथे) यांना वारसाहक्काने कोल्हापूरची गादी प्राप्त झाली.[३९]

भारतीय क्रांतीचा एक भाग म्हणून १८५७-५८ साली कोल्हापूर संस्थानमध्ये बंड उफाळून आले. कोल्हापूरमध्ये अनेक क्रांतीकारी येऊन थोड्या कालावधीसाठी स्थायिक झाले. या घटनेव्यतिरिक्त कोणतीही महत्त्वाची घटना कोल्हापूरमध्ये घडली नाही. यानंतर छत्रपती राजाराम महाराज दोन (१८६६-७०) यांनी राज्यकारभार पाहिला. त्यांच्यापाठोपाठ शिवाजी (पाचवे) (१८७०-१८८३) शाहू महाराज (१८७४-१९२२) आणि छत्रपती राजाराम महाराज (१९२२-४०) यांनी राज्यकारभार पाहीला. २६ नोव्हेंबर १९४० रोजी राजाराम महाराज यांचा मृत्यू झाला. त्यांना मुलबाळ नव्हते. त्यामुळेच १९४२-४६ या कालावधीत राजगादी राजावीना होती. पुढे त्यांच्या पत्नीने एक मूल दत्तक घेतले व राज्यकारभाराचे व्यवस्थापन राजमंडळाद्वारे कार्यान्वीत केले. पुढे मार्च १९४९ साली कोल्हापूर संस्थानचे मुंबई राज्यामध्ये विलीनकरण करण्यात आले.[४०]

कोल्हापूर संस्थानमध्ये होऊन गेलेल्या राजांमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये अनेक शैक्षणिक सुधारणा केल्या. अनेक कायदे करून शिक्षणव्यवस्था

सर्व जातीधर्मांसाठी खुली केली. शाहू महाराजांनी शिक्षणप्रसार करून कोल्हापूरच्या शैक्षणिक, सामाजिक आर्थिक क्षेत्रामध्ये प्रगती केली. कोल्हापूरमधील सामाजिक परिस्थिती व शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्याविषयी माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**कोल्हापूरमधील सामाजिक परिस्थिती व शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण -**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची इ.स. १८९४ -१९२२ पर्यंतची कारकीर्द केवळ कोल्हापूर संस्थानच्या नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली. कारण छत्रपती शाहू महाराज यानी ध्येयवादी दृष्टीकोनातून व नियोजनपूर्वक बहुविध व सर्वंकष सुधारणा केल्या. त्यामुळे कोल्हापूर बराबरोच महाराष्ट्रातील जनतेमध्ये देखील सामाजिक क्रांती घडून आली. कोल्हापूर संस्थानची राजसूत्रे शाहू महाराजांनी वयाच्या केवळ २० व्या वर्षी हाती घेतली. तेव्हापासून सामान्य जनतेची सर्वांगिण प्रगती शक्यतो लवकर साधावी हे ध्येय त्यांनी नजरेसमोर ठेवले. त्यासाठी त्यांनी प्रशासन शेती, उद्योगधंदे, शिक्षण, आरोग्य, या क्षेत्रात अमूलाग्र बदल घडवून आणण्यास सुरूवात केली. शिक्षणाचे महत्त्व व सामर्थ्य शाहू महाराजांना पटले होते. त्यांनी शिक्षणक्षेत्रात अमूलाग्र सुधारण घडवून आणण्यास आग्रक्रम दिला.

शाहू महाराजांनी प्रारंभ केलेले शैक्षणिक धोरण शेवटपर्यंत चालू ठेवले. शाहू महाराजांनी शैक्षणिक धोरणामध्ये खालील तीन गोष्टींवर जास्तीत जास्त भर दिला.

१. विविध प्रकारच्या व वेगवेगळया स्तरावरच्या शिक्षण संस्थाची स्थापना करणे. विद्यार्थ्यांना मुबलक प्रमाणत सवलती देवून कोल्हापूर संस्थानात शिक्षण प्रसाराला चालना देणे.

२. विविध जाती जमातींच्या विद्यार्थ्यांची राहण्या-जेवणाची पर्याप्त व्यवस्था करणे. त्यासाठी कोल्हापूर शहरात विद्यार्थी वसतिगृहाची अभिनव मोहीम सुरू करणे.

३. कोल्हापूर संस्थाना बाहेरील विविध प्रकारच्या शिक्षण संस्थांना आर्थिक व इतर सहाय्य देणे.

**कोल्हापूरमधील सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती -**

छत्रपती शाहू महाराज गादीवर आले त्यावेळी कोल्हापूर संस्थानातील शिक्षणविषयक परिस्थिती अतिशय असमाधनकारक व अन्याय परिपोषक हाती. जनतेच्या विविध विभागांमध्ये शैक्षणिकदृष्ट्या प्रचंड तफावत होती. अल्पसंख्य ब्राम्हण समाज तेवढा शिक्षित होता आणि संख्येने मोठा असलेला ब्राम्हणेतर समाज मात्र बहुतांशी निरक्षर होता. त्यामुळे संस्थानातील प्रशासकीय व्यवस्थेमध्ये ब्राम्हण समाजाचे वर्चस्व प्रस्थापित झाले हेते. उदाहरणार्थ १८९४ साली कोल्हापूर संस्थानाच्या प्रशासकीय सेवेत ब्राह्मण अधिकाऱ्यांची संख्या ६० होती तर ब्राह्मणेतर अधिकाऱ्यांची संख्या ११ होती. छत्रपती शाहू महाराजांच्या खास सेवेतदेखील ४६ ब्राह्मण होते तर फक्त ७ ब्राह्मणेत्तर होते. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ही आकडेवारी मोठी विचित्र व चिंताजनक होती. कारण त्यावेळी कोल्हापूर संस्थानाच्या एकूण ९ लाख लोकसंख्येपैकी ब्राह्मणांची लोकसंख्या फक्त २६ हजार होती. तसेच त्यावेळी कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या ४४१ विद्यार्थ्यांमध्ये ३६८ ब्राह्मण विद्यार्थी होते. राजाराम कॉलेजमध्ये एकूण ६१ विद्यार्थी होते. त्यापैकी ५५ विद्यार्थी केवळ ब्राह्मण वर्गाचे होते.

ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर समाजातील अधिकारी व विद्यार्थी यांच्या संख्येतील प्रचंड विषमतेवरून वस्तुस्थिती समजते. ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर समाजातील लोक

यांच्यातील साक्षरतेच्या प्रमाणात भयानक स्वरूपाची तफावत होती. सन १८८१ च्या खानेसुमारीनुसार कोल्हापूर संस्थानात विविध समाजातील साक्षरतेचे प्रमाण खालीलप्रमाणे होते -

| | | |
|---|---|---|
| ब्राह्मण | - | ७९.१% |
| मराठा | - | ८.६% |
| कुणबी | - | १.५% |
| जैन व लिंगायत | - | १०.६% |
| मुसलमान | - | ७.५% |

या साक्षरतेच्या प्रमाणानुसार ब्राह्मणेत्तर जाती शिक्षणाच्या बाबतीत किती मागासलेल्या होत्या हे स्पष्ट होते. ही विषमता बदलण्याचे आव्हान छत्रपती शाहू महाराजांपुढे होते. छ. शाहू महाराजांनी त्यावेळचे थोर समाजसुधारक न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, राजकीय विचारवंत गोपाळकृष्ण गोखले, डॉ.रामकृष्ण भांडारकर, मुंबई प्रांताचे शिक्षण संचालक मि. गाइल्स यांच्याशी सल्लामसलत केली. या सर्वांचा विचार घेतल्यानंतर शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात खालील प्रमुख उपाययोजना व कार्यक्रम नियोजनपूर्वक आखले व निष्ठेने पार पाडले.

१) कारकिर्दीच्या पहिल्या वर्षी शिक्षण क्षेत्रातील प्रचलीत परिस्थितीचा आढावा घेतला. त्यात प्रगती सुचविण्यासाठी 'शिक्षणविषयक समिती'ची स्थापना केली.

२) प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा यांची संख्या वाढविली.

३) राजाराम कॉलेजचे महत्त्व व प्रतिष्ठा वाढेल असे प्रयत्न केले.

४) बहुजन समाजाच्या व गरीब घराण्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, पारितोषिके, नादाऱ्या आदि स्वरूपात शैक्षणिक सवलती उपलब्ध करून दिल्या.

५) शाळातील अभ्यासक्रमाची जाणीवपूर्वक पुर्नरचना करण्यात आली.

६) शाळांची निर्मिती, देखभाल, उत्पन्नखर्च इ. संबंधी स्पष्ट नियम घालून देण्यात आले.

७) निर्धारित कसोट्याना अनुसरून शाळातील शिक्षकांची निवड करावी असे निर्बंध घालण्यात आले.

८) शिक्षणावर होणाऱ्या वाढत्या खर्चाची तरतूद करण्यासाठी खास 'शिस्त-कर' १९१८ साली बसविण्यात आला.

९) अस्पृश्यांसाठी असलेल्या स्वतंत्र शाळा बंद करण्यात आल्या.

१०) ग्रंथालयांना अनुदान देण्याची पद्धत सुरू करून गरीब विद्यार्थ्यांना ग्रंथ पुरविण्यासाठी 'पुस्तक पेढी योजना' आखण्यात अली.

११) मुलांना लष्करी शिक्षण देण्यासाठी एक 'इन्फट्री स्कूल' सुरू केले.

१२) मुलांना तांत्रिक शिक्षण देण्यासाठी 'टेक्नीकल इन्स्टीट्यूट' ची सुरवात करण्यात आली.

१३) मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या राहण्या जेवण्याची मोफत व्यवस्था दरबारातर्फे १९१९ सालापासून करण्यात आली.

१४) संस्कृत शिक्षणाच्या प्रसारासाठी विविध योजना आखण्यात आल्या.

१५) शिक्षकांना खास शिक्षण देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन 'स्वतंत्र शिक्षक प्रशिक्षण केंद्र' १९१२ साली काढण्यात आले.

१६) हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी, स्पर्धात्मक परिक्षा देण्यासाठी परदेशी पाठविण्यात आले.

१७) राजाराम कॉलेजमधील मुलींना शिक्षण फी माफ करण्यात आली.

१८) शाळांच्या देखरेखीसाठी सरकार नियुक्त सभासद असलेल्या स्कूलपंच कमिट्यांची पुर्नरचना करण्यात आली.

१९) प्रत्येक गावात शाळा काढून ती सुस्थिर करण्यासाठी 'वतनदार शिक्षक योजना' १९१२ साली सुरू करण्यात आली. १९१७ साली याच योजनेचे रूपातर 'पगारी शिक्षक योजने' मध्य करण्यात आले.

२०) कोल्हापूरच्या मॅट्रीक परिक्षेचे सेंटर १९१९ साली दरबारकडून स्व-खर्चाने सुरू करण्यात आले.

२१) प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यत आले.

**विद्यार्थी वसतिगृहाची मोहीम -**

कोल्हापूरमध्ये विविध शैक्षणिक सोयी उपलब्ध होत्या. परंतू त्याचा फायदा खेड्यातील गोर गरीब घरातील विद्यार्थ्यांना होत नव्हता. कारण शहरात त्यांना राहण्या जेवण्याच्या सुविधा अल्पखर्चात मिळत नव्हत्या. १८९६ च्या सुमारास कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजला संलग्न असे बोर्डीग सुरू करण्यात आले होते. परंतु त्या बोर्डीगमध्य ब्राम्हणेत्तर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात नसे. ब्राम्हणेत्तर विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय करण आवश्यक होते. ही जाणीव शाहू महाराजांना झाली. छत्रपती शाहू महाराजांनी सन १९००साली काही ब्राम्हणेत्तर विद्यार्थ्यांची आपल्या राजवाड्यामध्ये व्यवस्था केली. (या विद्यार्थ्यामध्येच ऐतवड्याचा भाऊ पायगोंडा पाटील हा विद्यार्थी राहत होता व तोच पुढे कर्मवीर भाऊराव पाटील म्हणून प्रसिद्ध झाला.) पुढे काही कारणांनी राजवाड्यावरील प्रयोग फसला. नंतर शाहू महाराजांनी वेगवेगळ्या जातीतील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे काढण्याची मोहीम हाती घेतली. त्यासाठी शाहू महाराजांनी राज्यातील प्रमुख जातींच्या पुढाऱ्याना व कार्यकर्त्यांना पाचारण केले. त्यांना आपापल्या जातीतील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे कोल्हापूर शहरात स्थापन करण्यास प्रवृत्त केले. कारण प्रत्येक व्यक्तीला आपली स्वतःची जात प्रिय असल्याने त्या जातीच्या उन्नतीसाठी सर्वतोपरी सहाय्य करण्यास ती व्यक्ती सदैव तयर असते.

ही वस्तुस्थिती शाहू महाराजांनी जाणली होती. छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत त्यांच्या प्रेरणेने व पुढाकाराने खालील २० विद्यार्थी वसतिगृहे सुरू करण्यात आली.

| अ.नं. | सन | नांव |
|---|---|---|
| १. | १९०१ | व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग (हल्लीचे श्री शाहू छत्रपती बोर्डींग) |
| २. | १९०५ | दिगंबर जैन बोर्डींग |
| ३. | १९०६ | वीरशैव लिंगायत बोर्डींग |
| ४. | १९०६ | मुस्लीम बोर्डींग |
| ५. | १९०७ | मिस क्लार्क बोर्डींग |
| ६. | १९०८ | दैवज्ञ बोर्डींग |
| ७. | १९११ | नामदेव बोर्डींग |
| ८. | १९१२ | कायस्थ प्रभू बोर्डींग |
| ९. | १९१२ | पांचाल ब्राम्हण बोर्डींग |
| १०. | १९१२ | सारस्वत बोर्डींग |
| ११. | १९१५ | इंडियन ख्रिश्चन होस्टेल |
| १२. | १९१८ | आर्यसमाज गुरूकुल |
| १३. | १९१८ | वैश्य बोर्डींग |
| १४. | १९१९ | ढोर-चांभार बोर्डींग |
| १५. | १९२० | शिवाजी वैदिक विद्यालय |
| १६. | १९२० | प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग |
| १७. | १९२० | सोमवंशिय आर्य क्षत्रिय बोर्डींग |
| १८. | १९२१ | सुतार बोर्डींग |
| १९. | १९२१ | नाभिक बोर्डींग |
| २०. | १९२१ | श्री. देवांग बोर्डींग |

कोल्हापूरमध्ये विद्यार्थी वसतिगृहाची मोहीम सुरू करण्यामागे विविध जातींनी

परस्पर प्रेमपूर्वक व ऐकीच्या भावनेने वागावे आणि प्रत्येक जातीने स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करावा अशी छत्रपती शाहू महाराजांची भावना व अपेक्षा होती. त्यानी ही आशावादी भूमिका दिनांक ९ ऑगस्ट १९०५ रोजी दिगंबर जैन बोर्डींगच्या उद्‌घाटनप्रसंगी व्यक्ती केली.

**शाहू महाराजांच्या शिक्षण कार्याची फलश्रुती -**

छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षण कार्याचा प्रभाव कोल्हापूर संस्थानाबरोबर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेवर पडला. त्यातूनच आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण होण्यास व त्याची प्रगतीकडे मार्गक्रमण होण्यास सुरवात झाली. खालील बाबतीत शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे कोल्हापूरवर व महाराष्ट्रावर सुयोग्य परिणाम झाले.

**१) कोल्हापूरमध्ये शिक्षणाचा प्रसार -**

छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणांमुळे शिक्षणाचा प्रसार वाढला. शैक्षणिक क्षेत्रात ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी संपुष्टात येऊन ब्राम्हणेत्तर व अस्पृश्य समाजात देखील शिक्षणाची लालसा निर्माण झाली. छत्रपती शाहू महाराजांच्या १८९४ ते १९२२ पर्यंतच्या कारकीर्दीत झालेली विविध स्तरावरील शैक्षणिक प्रगती खालीलप्रमाणे झाली.

| अ.नं. | बाब | १८९४ | १९२२ |
|---|---|---|---|
| १. | एकूण शिक्षण संस्था | २२४ | ५५९ |
| २. | एकूण विद्यार्थी संख्या (राजाराम कॉलेज सोडून) | १०,८८४ | २७,८३० |
| ३. | ब्राह्मणेत्तर विद्यार्थी संख्या | ८,०८८ | २१,०२७ |
| ४. | अस्पृश्य विद्यार्थी संख्या | २३४ | २,१६२ |
| ५. | ब्राह्मण विद्यार्थी संख्या | २,५२२ | २,७२२ |
| ६. | राजाराम कॉलेज एकूण विद्यार्थी | ७९ | २६५ |
| ७. | विविध वसतिगृहातील विद्यार्थी | ११८ (१९१० साली) | ३२१ |
| ९. | मुलींची शाळा | २५ | ३३ |
| १०. | शिक्षणावरील एकूण खर्च रूपये | १ लाखापेक्षा कमी | ३ लाखाहून जास्त |

वरील तक्त्यावरून काही गोष्टी ठळकपणे प्रत्ययास येतात. राजाराम कॉलेजमध्ये १८९४ साली फक्त ७.६ टक्के ब्राह्मणेत्तर विद्यार्थी होते. तीच संख्या १९२२ साली ३७.७ टक्के एवढी झाली. शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणामुळे महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या ब्राह्मणेत्तर विद्यार्थी संख्या ५ पटीने वाढली. तसेच एकूण विद्यार्थी संख्या ९ पटीपेक्षा जास्तीने वाढली. संस्थानच्या शिक्षणावरील खर्च तिपटीपेक्षा जास्तीने वाढला. फक्त राजाराम कॉलेज व राजाराम हायस्कूल यातील विद्यार्थ्यांचे जातवार प्रमाण खालील परिस्थितीवरून लक्षात येते.

| वर्ष | ब्राह्मण विद्यार्थी प्रमाण | ब्राह्मणेत्तर विद्यार्थी प्रमाण | एकूण |
|---|---|---|---|
| १८९४ | ९०.१०% | ९.९०% | १००% |
| १९२२ | ४८.८०% | ५१.२०% | १००% |

याचा अर्थ असा की छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या ब्राह्मण विद्यार्थ्यांची संख्या निम्मी झाली तर ब्राह्मणेत्तर विद्यार्थ्यांची संख्या पाच पटीने वाढली.

**महाराष्ट्रात शिक्षण कार्याची प्रेरणा -**

छत्रपती शाहू महाराजांनी विचारपूर्वक व दुरदर्शीपणे शैक्षणिक धोरण राबविले. त्यांच्यापासून महाराष्ट्रातील विविध भागातील कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी प्रेरणा घेतली. या नेत्यांनी सामान्य जनतेत शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शिक्षणसंस्था स्थापन केल्या. दुर्लक्षित व दलीत समाजातील विद्यार्थ्यांना अगदी उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्व सोयी, सवलती उपलब्ध करून दिल्या. खालील प्रमुख नेत्यांनी वेगवेगळ्या शिक्षण संस्था स्थापन केल्या.

| अ.नं. | संस्थापक | शिक्षण संस्थेचे नांव |
|---|---|---|
| १. | कर्मवीर भाऊराव पाटील | रयत शिक्षण संस्था, सातारा |
| २. | कर्मवीर भाऊसाहेब हिरे | मराठा शिक्षण संस्था, मालेगांव |
| ३. | डॉ. पंजाबराव देशमूख | श्री शिवाजी ऐज्युकेशन सोसायटी,अमरावती |
| ४. | बाबासाहेब आंबेडकर | पीपल्स ऐज्युकेशन सोसायटी, मुंबई |
| ५. | डॉ. बापुजी साळुंखे | श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर |
| ६. | श्री. व्ही.टी. पाटील | ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर |
| ७. | बॅ. बाळासाहेब खर्डेकर आणि प्राचार्य एम.आर. देसाई | जनता शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर |
| ८. | कर्मवीर मामासाहेब जगदाळे | शिवाजी शिक्षण संस्था, बार्शी[४१] |

या शैक्षणिक संस्थांनी सामान्य जनतेसाठी परिश्रमपूर्वक केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलून गेला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या इच्छेनुसार रयत शिक्षण संस्थेने कोल्हापूरमध्ये महाविद्यालय स्थापन करण्याच्या हालचाली सुरू केल्या. त्यावेळी कोल्हापूरच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा पुढीलप्रमाणे मांडता येईल.

**कोल्हापूरमधील विविध शैक्षणिक संस्था व त्यांचे कार्य -**

**१) स्वामी विवेकानंद शैक्षणिक संस्था -**

१९४५ साली या संस्थेची स्थापना डॉ. जी.टी उर्फ बापुजी साळुंखे यांनी केली. ६ जून १९५५ साली या संस्थेने हायस्कूलची स्थापना केली. या हायस्कूलला छत्रपती शाहू हायस्कूल असे नाव देण्यात आले. या हायस्कूलचे उद्‌घाटन जे.पी.नाईक यांनी केले. सुरूवातीला या शाळेतील विद्यार्थी संख्या फक्त ४५ एवढी होती. १९८८-८९ साली ही संख्या १६६८ एवढी झाली. या संस्थेने पुढे महाविद्यालय सुरू केले. संस्थेतर्फे १४१ हायस्कूल व अनेक महाविद्यालये या शैक्षणिक संस्थेमार्फत चालविली जात आहेत.

**२) ताराराणी विद्यापीठ -**

सुरवातीला ही शैक्षणिक संस्था फक्त महिलांसाठीच सुरू करण्यात आली होती. या संस्थेची सुरवात १९४५ मध्ये ताराराणी विद्यामंदीर या माध्यमातून सुरू करण्यात आली. १९५२ मध्ये या विद्यामंदिराचे हायस्कूलमध्ये रूपांतर करण्यात आले. १९५३ मध्ये या विद्यामंदिराचे ताराराणी विद्यापीठात रूपांतरीत केले. या शिक्षणसंस्थेने स्त्रियांमध्ये शिक्षण प्रसारासाठी विशेष प्रयत्न केले. त्याचबरोबर कॉलेज व बोर्डींगची सोयसुद्धा उपलब्ध करून देण्यात आली.[४२]

**३) विद्यापीठ हायस्कूल -**

१९१७ साली 'विद्यापीठ' या नावाने या शैक्षणिक संस्थेची स्थापना झाली. १९३३ साली या संस्थेचे नामांतर 'विद्यापीठ सोसायटी' असे करण्यात आले.

कोल्हापूरमधील ही शैक्षणिक संस्था शाहू महाराजांचा आदर्श व उद्दिष्ट्यांनुसार कार्यरत होती. आदर्श नागरीक व सामाजिक कार्यकर्ते घडविणे हे या संस्थेचे मूळ ध्येय होते.

**४) प्रिन्स शिवाजी शिक्षण संस्था, कोल्हापूर -**

सर्वसामान्य लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रिन्स शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना ७ मे १९४३ मध्ये करण्यात आली. सुरवातीला या संस्थेचे नांव प्रिन्स शिवाजी मराठा शिक्षण संस्था असे होते. ज्याच्यातून पुढे मराठा हा शब्द वगळण्यात आला. या संस्थेने आपल्या शैक्षणिक कार्याची सुरवात दोन हायस्कूल व तीन प्राथमिक शाळा सुरू करून केली.[४३]

**५) श्री शाहू शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर -**

ही शैक्षणिक संस्था सर्वात जुन्या शैक्षणिक संस्थांपैकी एक होती. या संस्थेची स्थापना १९४२ साली झाली. या संस्थेने शिवाजी मराठा हायस्कूल, दौलतराव भोसले विद्यालय व गर्ल्स हायस्कूल या शाळा चालविल्या.

**६) न्यू एज्युकेशन सोसायटी -**

या संस्थेची सुरवात १ मे १९२१ रोजी न्यू हायस्कूलची स्थापना करून करण्यात आली. १९७० पासून या संस्थेने मुकबधीरांसाठी शाळा स्थापन करून सामाजिक कार्यास सुरवात केली. आज संस्था कनिष्ठ महाविद्यालय मुलींची स्वतंत्र शाळा आणि अद्यापक विद्यालय चालवीत आहे.

**७) आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळ -**

या संस्थेची स्थापना २९ एप्रिल १९६३ रोजी झाली. जून १९६३ मध्ये श्री देशमुख विद्यामंदिर सुरू करून या संस्थेने शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला. १९६९ साली या संस्थेने श्री सिद्धेश्वर हायस्कूल स्वतःच्या ताब्यात घेतले व पुढे तिचे

दादासाहेब मगदूम हायस्कूल असे नामकरण करण्यात आले. नंतरच्या काळात कनिष्ठ महाविद्यालय शिक्षणशास्त्र महाविद्यालय अशी अनेक महाविद्यालये ही संस्था चालवित आहे.

**८) प्रायव्हेट एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर -**

या संस्थेने माध्यमिक शिक्षणाच्या प्रसाराकरीता प्रयत्न केले. या संस्थेची स्थापना १९१९ साली झाली. या संस्थेने प्रायव्हेट हायस्कूल सुरू केले.[४४]

**इंग्रजी माध्यमाच्या शाळा -**

आधुनिक काळात इंग्रजी भाषेस महत्त्व आहे. त्यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करणे गरजेचे बनले आहे. कोल्हापूर शहरात १९ व्या शतकात फक्त एकच इंग्रजी शाळा होती. पुढे १९७२ साली इस्टर्न पॅटर्न गर्ल्स हायस्कूल व १९१५ साली आर्यविन ख्रिश्चन हायस्कूल सुरू झाले. ही हायस्कूल पूना कॅथलिक असोसिएशन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीची होती. या संस्थेचे नांव पूना जिझस्ट स्कूलर्स सोसायटी असे होते. ही शाळा कोल्हापूर शहरातील सगळ्यात महत्त्वाची शाळा म्हणून ओळखली जावू लागली. ही शाळा कोल्हापूर कसबा-बावडा रोडवर स्थापित होती. या शाळेची पहिली एस.एस.सी. बॅच १९६२ साली बाहेर पडली.

शहरातील दुसरी प्रमुख इंग्रजी शाळा सेव्हन्थ डे अॅडव्हेन्टीस्ट हायस्कूल ही होती. जिची स्थापना १९७५ साली झाली. सेव्हन्थ डे अॅडव्हेन्टीस्ट चर्च ही शाळा चालवित असे. पुढे १९८४ साली ही शाळा कौन्सिल फॉर इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशन न्यू दिल्लीशी सलग्न झाली. ही शाळा शिवाजी पार्क येथे सुरू झाली.

१९७६ साली डॉ. सदाशिव राऊत यांनी राजारामपुरी येथे ओरिएन्टल इंग्लिश अॅकॅडमिक स्कूलची स्थापना केली. १९८५ साली शिक्षण प्रसारक मंडळ

संचलित गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयाने न्यू इंग्लिश मेडियम स्कूलची स्थापना केली.[४५] सुरवातीला नर्सरी, के.जी. व पहिली इयत्ता पर्यंतचे वर्ग होते. पुढे विद्यार्थी संख्या व वर्गांची संख्या वाढत गेली. ही शाळा पुढे संभाजीनगर येथे स्थलांतरित करण्यात आली.

१९८५ साली न्यू पॅलेस येथे छत्रपती शाहू इंग्लिश मेडियम स्कूलची स्थापना झाली. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने त्यांच्या ताराबाई पार्क येथील संस्थेत न्यू मॉडेल इंग्लिश स्कूलची स्थापना करण्यात अली. १९८९ साली डॉ. ए.डी.शिंदे यांनी राधाबाई शिदे इंग्लिश मेडियम स्कूलची सुरवात शाहू इन्स्टीटयूट ऑफ बिझनेस एज्युकेशन ॲण्ड रिसर्च सेंटर येथे केली.

या इंग्रजी शाळांबरोबरच इतर इंग्रजी शाळा उदा. डॉ. डी.वाय. पाटील विद्यानिकेतन, होलीक्रॉस कॉन्व्हेन्ट हायस्कूल, प्रिमिअर इंग्लिश स्कूल, भैय्यासाहेब परदेशी स्कूल, दत्ताबाळ शिशूविहार अशा इंग्रजी शाळा शहरात कार्यरत होत्या.

## १९४९ ते १९७२ या काळातील कोल्हापूर शहरातील महाविद्यालयीन शिक्षणाची स्थिती'

इयत्ता आठवी ते दहावीपर्यंतच्या शिक्षणाला माध्यमिक शिक्षण म्हणून संबोधले जात असे. माध्यमिक शिक्षणानंतरचे शिक्षण ४ वर्षे कालावधीचे होते. त्यातील पहिले वर्ष प्री डिग्री कोर्स म्हणून संबोधले जात असे. १९७२-७३ साली महाराष्ट्र सरकारने १० + २ + ३ हा नवीन शैक्षणिक आकृतीबंध अंमलात आणला. इयत्ता १० वीच्या वार्षिक परीक्षांना एस.एस.सी. व तेथून पढे दोन वर्षाच्या अभ्यासक्रमांना एच.एस.सी. असे वर्गीकरण करण्यात आले. एच.एस.सी.चे वर्ग हायस्कूल व सिनिअर कॉलेजशी संलग्न होते. १९ फेब्रुवारी, १९७६ साली महाराष्ट्र सरकारने ११ वी व

१२ वीचे वर्ग वेगवेगळे व्हावत असा अध्यादेश काढला.[४६] याची सुरूवात हायस्कूलबरोबर सिनिअर कॉलेजेसमध्ये करण्यात आली. १९७७-८१ च्या कालावधीमध्ये एच.एस.सी. मध्ये शिकत असलेली विद्यार्थी संख्या खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

| वर्ष | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| १९७७ | ३,९१३ |
| १९७८ | ४,१९१ |
| १९७९ | ४,२५१ |
| १९८० | ५,८०२ |
| १९८१ | ३,९३० |

वरील सांख्यिकी माहितीवरून +२ वर्गामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संख्येमध्ये घट झाल्याचे दिसून येते. कारण एस.एस.सी. नंतर तांत्रिक कोर्स किंवा प्रोफेशनल कोर्सला महत्त्व आले. १८८० साली उच्च शिक्षणाची सुरूवात राजाराम महाविद्यालयाची स्थापना करून करण्यात आली. १९४९ पर्यंत शहरामध्ये फक्त तीनच महाविद्यालये होती. ती पुढीलप्रमाणे -

१. राजाराम कॉलेज
२. शहाजी लॉ कॉलेज
३. महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय

ही तीनही महाविद्यालये राज्यसरकार संचलित होती. १९६१ पर्यंत उच्च महाविद्यालयाची संख्या वाढून ६ झाली. १९६२ मध्ये कोल्हापूरमध्ये शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. तेथून पुढे शहरामध्ये शैक्षणिक विकास वेगाने झाला. १९६२-७१ च्या कालावधीत महाविद्यालयांची संख्या १३ इतकी वाढली. १९७१-८१ या दशकात फक्त एकच नवीन कॉलेजची भर पडली. १९९० पर्यंत शहरामध्ये विविध शाखांची मिळून

२४ महाविद्यालये होती. याचाच अर्थ १९४९ ते १९९० या ४१ वर्षांत महाविद्यालयांची संख्या ३ वरून २४ एवढी वाढली. कोल्हापूरमधील महाविद्यालयांची त्यांच्या कार्यक्षमतेनुसार नांवे पुढीलप्रमाणे[४७]-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | राजाराम कॉलेज | - | १८८० |
| २. | शहाजी लॉ कॉलेज | - | १९३३ |
| ३. | एस.एम.टी.टी. शिक्षणशास्त्र महाविद्यालय | - | १९३४ |
| ४. | गोपालकृष्ण गोखले कॉलेज | - | १९५० |
| ५. | कॉमर्स कॉलेज | - | १९५७ |
| ६. | किर्ती कॉलेज (नंतरचे शाहू कॉलेज) | - | १९६१ |

वरील ५ महाविद्यालये कोल्हापूर शहरात उच्च शिक्षण प्रसारीत करण्याचे कार्य करीत होती. शहराची वाढती लोकसंख्या व शैक्षणिक जागृती यामुळे अजूनही महाविद्यालयांची आवश्यकता भासत होती. ती पूर्ण करण्यासाठी आणि भाऊरावांच्या स्वप्नांची पूर्ती करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने कोल्हापूर शहरात महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यामागील सविस्तर पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे -

**राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय स्थापनेमागील पार्श्वभूमी -**

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय हे रयत शिक्षण संस्थेचे महाविद्यालय आहे. हे महाविद्यालय सध्या कदमवाडी (विचारेमाळ) येथे सुरू आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय सुरूवातीस किर्ती कॉलेज या नावाने सुरू होते. किर्ती कॉलेजची स्थापना मा. श्री. व्ही.टी. पाटील यांनी केली.

मा.श्री. व्ही.टी. पाटील हे कोल्हापूरमध्ये शिक्षणासाठी आले. १९२३ साली ते मॅट्रीक परीक्षा पास झाले. १९२७ साली बी.ए. झाले. १९२९ साली एल.एल.बी. ची परीक्षा पास झाले. त्यांनी १९३० पासून कोल्हापूरात वकीली करण्यास सुरूवात केली.

15869

कोल्हापूरमध्ये वकीली करत असताना त्यांची छत्रपती कै. राजाराम महाराज यांच्या भेटीचा योग आला आणि त्या वेळेपासून श्री. व्ही. टी. पाटील राजाराम महाराजांचे भक्त बनले. कै.राजाराम महाराजांचा श्री. व्ही.टी. पाटील यांच्यावर शेवटपर्यंत लोभ होता.

१९३० साली श्री. व्ही.टी. पाटील यांनी वकीलीस सुरूवात केली. त्या वेळेस त्यांनी मनात एक संकल्प सोडला होता की जे शिक्षण त्यांना खंडीतपणे व अनंत अडचणीतून मार्ग काढीत घ्यावे लागले ते शिक्षण बहुजन समाजातील मुलामुलींना सुलभतेने मिळावे म्हणून २० वर्षे वकीली करावयाची आणि २० वर्षे पुरी होताच वकीलीचा संन्यास घेऊन उर्वरित सर्व जीवन बहुजन समाजातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी खर्च करावयाचे.

१९५० हे साल श्री. व्ही.टी. पाटील यांच्या संकल्पपूर्तीचे वर्ष १९३० साली वकिलीस सुरूवात केली आणि १९५० साली त्याच्या वकिलीस वीस वर्षे पूर्ण झाली. १९५० साली श्री. व्ही.टी. पाटील कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष होते. १९४९ साली कोल्हापूर संस्थानचे विलीनीकरण झाले आणि त्यानंतर मुंबई हायकोर्टचे चीफ जस्टीस न्यायमूर्ती छगलासाहेब यांनी कोल्हापूरच्या बार असोसिएशनला भेट देण्याचे ठरविले. बार असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून कोल्हापूरात न्यायमुर्ती छगलासाहेबांचे अतिभव्य असे स्वागत श्री. व्ही. टी. पाटील यांनी केले आणि दुसऱ्याच दिवसापासून म्हणजेच १९५० सालापासून श्री. व्ही.टी. पाटील यांनी त्यांच्या वकिली व्यवसायास रामराम ठोकला. त्या दिवसानंतर केव्हाही वकील म्हणून त्यांनी काम स्वीकारले नाही.

कैलासवासी राजाराम महाराजांनी श्री. व्ही. टी. पाटील यांना आपले मानले होते. त्यांच्या पाठींब्यामुळे त्या काळात श्री. व्ही. टी. पाटील यांच्या वकीलीचा जम

कोल्हापूरात बसला होता. तसेच कोल्हापूर संस्थानातील बहुतेक सर्व सार्वजनिक संस्थांची मानाची पदे त्यांना मिळाली होती.

श्री. व्ही. टी. पाटील महाराजांच्या भेटीसाठी अधूनमधून राजवाड्यांवर जात असत. अशाच एका प्रसंगी अनेक दरबारी अधिकाऱ्याच्या उपस्थितीत महाराजांनी पाटील यांना जवळ बोलाविले आणि म्हटले, "पाटील माझ्या देहाचा मला आता भरवसा वाटत नाही. कोणत्याही क्षणी काहीही होईल. पण माझ्या मृत्यूपूर्वी एक गोष्ट कोल्हापूरात झाली पाहिजे. ती म्हणजे जिच्या पराक्रमाची मी भाकरी खात आहे त्या ताराराणीचं तिच्या पराक्रमाला साजेसं स्मारक माझ्या कोल्हापूरात झालं पाहिजे आणि ते जर कोणी केलं तर त्याला मी माझं निम्म राज्यही द्यावयास तयार आहे."

ताराराणीबद्दलच्या महाराजांच्या या कृतज्ञ भावनेमुळे श्री. व्ही. टी. पाटील भारावून गेले. त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले आणि ते सहजपणे उद्‌गारले, "महाराज आपण काळजी करू नये. आपली ही इच्छा आम्ही पूर्ण करू."

१९३८ साली श्री व्ही. टी. पाटील आणि राजाराम महाराज यांच्यामध्ये हे बोलणे झाले. १९५० साली महाराजांचे आकस्मितपणे निधन झाले.

महाराजांच्या हयातीत महाराजांची अखेरची इच्छा ताराराणीच्या स्मारकाची पुरी करण्यासाठी कोणीही दरबारी अधिकारी पुढे आले नाहीत. परंतु त्यांच्या हयातीत त्यांची इच्छा पूर्ण होवू शकली नाही, त्यामुळे श्री. पाटील यांच्या मनाला चुटपुट लागली. कळत न कळत छ. राजाराम महाराजांसारख्या असामान्य कृतज्ञतेच्या छत्रपतीला ताराराणीच तिच्या पराक्रमाला साजेसं स्मारक कोल्हापूरात बांधण्याचे वचन श्री. व्ही. टी. पाटील यांनी दिले होते. परंतु हे कार्य पूर्ण झालेलं नव्हत. १९४५ साली राजारामपुरीतील एका भाड्याच्या इमारतीत ताराराणी विद्यामंदीर या नावाचे एक माध्यमिक हायस्कूल फक्त २२ मुलींनिशी श्री. व्ही. टी. पाटील यांनी सुरू केले.

यथावकाश ही संस्था वाढू लागली. मुलींची संख्याही वाढू लागली आणि रिजन्सी कौन्सिलकडून ६-७ एकर जागा ताराराणी विद्यापीठासाठी श्री. व्ही. टी. पाटील यांना मिळाली. अनेक अडचणी, संकटे पार करून १९५५ साली ताराराणी विद्यामंदीर या संस्थेचे रूपांतर श्री व्ही. टी. पाटील यांनी ताराराणी विद्यापीठात केले.

मराठा समाजात श्री. व्ही. टी. पाटील यांनी जन्म घेतला. या समाजाचे ऋण फेडण्यासाठी ते जीवनभर कष्ट करत राहिले. युगस्त्री ताराराणीने हिंदवी स्वराज्यावर, हिंदू धर्मावर अनंत ऋण करून ठेवले आहेत. हे ऋण छत्रपती राजाराम महाराजांनी मानले म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांची युगस्त्री सून ताराराणीचे चिरंतन स्मारक श्री. पाटील यांनी ताराराणी विद्यापीठाची स्थापना करून केले. तसेच ग्रामीण भागातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी भुदरगड तालुक्यासारख्या उपेक्षित डोंगराळ भागातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी गारगोटी येथे युगपुरूष शिवाजी महाराजांचे गुरू मौनी महाराज यांच्या नावाने मौनी विद्यापीठाची स्थापना केली. मौनी विद्यापीठ आणि ताराराणी विद्यापीठ यांच्या विकासासाठी श्री. व्ही. टी. पाटील यांनी आयुष्याची ५० वर्षे दिली. मराठा समाजातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी श्री. व्ही. टी. पाटील वयाच्या ८७ व्या वर्षीही श्रमत आहेत. त्यांनी स्थापन केलेली दोन्ही विद्यापीठे नावारूपाला आली आहेत.

ताराराणी विद्यापीठात पूर्व प्राथमिक, प्राथमिक, मल्टीपर्पज हायस्कूल (होमसायन्स, फाईन आर्टस व कॉमर्ससह) डी. एड कॉलेज वसतीगृह वगैरे अनेकविध स्तरावरील संस्था कार्य करत आहेत. तरीही श्री. व्ही. टी. पाटील यांच्या मनाला रूखरूख होती ती म्हणजे कै. राजाराम महाराजांना अपेक्षित असे ताराराणीचे तिच्या पराक्रमाला साजेसे स्मारक ते उभारू शकलेनाहीत. म्हणून व्ही. टी. पाटील यांनी ताराराणी विद्यापीठाच्या वतीने मुलींचे एक कॉलेज काढण्याचा संकल्प १९६१ साली सोडला

आणि एस.एन.डी.टी. विद्यापीठाची संलग्नता घेऊन किर्ती कॉलेज सुरू केले. मुलींच्या या कॉलेजमध्ये सुरूवातीला फारसा प्रवेश मुलींनी घेतला नाही म्हणून कॉलेजच्या जीवनात पहिल्यापासूनच अडचणी आणि अनंत कटकटी निर्माण होत होत्या.

१९६१ च्या प्रारंभापासून कॉलेजसाठी नामवंत असे प्राध्यापक, प्राचार्य मिळाले होते. डॉ. माडगूळकर, डॉ. इंदिरा जोशी, डॉ. टिकेकर, प्रा. ठक्कर, कै.डॉ. सुर्यकांत खांडेकर, प्रा. गिंडे, प्रा. चं. शं. पाटगावकर, इंग्रजी विषयासाठी प्रा. आर. व्ही. कणंगलेकर व प्राचार्य डॉ. उषा इथापे अशांसारखे निष्ठावंत, निष्णात, कार्यनिष्ठ प्राध्यापक किर्ती कॉलेजला मिळाले.

१९६२ साली शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली आणि एस.एन.डी.टी. शी संलग्न असलेले किर्ती कॉलेज, शिवाजी विद्यापीठाला जोडले. शिवाजी विद्यापीठाची संलग्नता घेतल्यानंतरही मुलींच्या संख्येत अपेक्षेप्रमाणे वाढ झाली नाही आणि आर्थिक अडचणी बहुतांश तशाच राहिल्या. काही प्रसंगी त्या अधिकच वाढत गेल्या. चांगले प्राध्यापक असूनही मुली हव्या तशा प्रवेश घेत नव्हत्या.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पवार हे श्री. व्ही. टी. पाटील यांचे चांगले स्नेही होते. त्यांनी श्री पाटील यांना सल्ला दिला. "पाटील, किर्ती कॉलेज हे फक्त मुलींच्यासाठी असल्याने फार मोठी संख्या कॉलेजला मिळणार नाही आणि किर्ती कॉलेज हे सदोदित तोट्यातच चालवावे लागेल. संस्थेच्या हिताच्या दृष्टीने किर्ती कॉलेज हे संमिश्र कॉलेज करावे, मुला-मुलींचे कॉलेज करावे." यावर श्री. व्ही. टी. पाटील यांनी खूप विचार केला. डॉ. पवार यांचा सल्ला मानणे म्हणजे त्यांच्या स्त्रीशिक्षण कार्यामध्ये पराभूत होण्यासारखे होते. सल्ला न मानला तर आर्थिक अडचणींमुळे संस्थेच्या जीवनात नेहमीच अस्थिरता येऊन संस्था धोक्यात येत चालली होती. त्यामुळे श्री. पाटील यांनी डॉ. पवारांचा सल्ला मानावयाचे ठरविले आणि किर्ती कॉलेज हे मुलामुलींचे कॉलेज करण्याचा निर्णय श्री. व्ही. टी. पाटील यांनी घेतला.

श्री. व्ही. टी. पाटील यांच्या या निर्णयाला कोल्हापूरातील दुसऱ्या एका प्रसिध्द कॉलेजच्या चालकांनी हरकत घेतली. शिवाजी विद्यापीठाकडे त्यांनी अर्ज केला आणि किर्ती कॉलेज हे संमिश्र कॉलेज करण्यास मान्यता देऊ नये म्हणून युक्तिवाद केला. त्यांचे म्हणणे पडले की मुलींचे कॉलेज म्हणून काढल्यानंतर ते कॉलेज आता मुलामुलींचे करता येणार नाही. ते मुलींचे कॉलेज म्हणूनच चालावयास हवे.

ज्या कॉलेजच्या चालकांनी ही तक्रार नोंदविली होती ती शिक्षण क्षेत्रातील नामवंत मंडळी होती. डॉ. पवारांनाही त्यांना दुखवावयाचे नव्हते. त्यांनी त्या संस्था चालकांच्या हरकतीचा तो अर्ज त्यावेळच्या महाराष्ट्र शासनाच्या कायदा विभागाकडे निर्णयासाठी पाठविला.

या सर्व अनपेक्षित घटनांनी डॉ. पाटील गोंधळून गेले. पण अखेर महाराष्ट्र शासनाच्या सल्लागाराकडून त्यांना अनुकूल असा निर्णय आला. ताराराणी विद्यापीठाने घेतलेला निर्णय म्हणजे निव्वळ स्त्रियांच्यासाठी असलेले किर्ती कॉलेज मुलामुलींचे करण्याचा हक्क संस्था चालकांचा निर्णय हा पूर्णपणे कायदेशीर आहे.

श्री. व्ही. टी. पाटील यांच्या नवीन धोरणामुळे किर्ती कॉलेजमध्ये मुलामुलींची संख्या वाढू लागली. आर्थिक भार थोडा थोडा सुसहाय्य होवू लागला. पण संमिश्र कॉलेज केल्याने दुसऱ्याच काही अनपेक्षित अडचणींना तोंड द्यावे लागले. किर्ती कॉलेजमध्ये मुलांचा भरणा होऊ लागला. त्यापैकी काही मुले काही वेळा मुलींची छेड काढू लागली. किर्ती कॉलेज ताराराणी विद्यापीठाच्या परिसरात क्रिडांगणाच्या पश्चिमेकडील इमारतीमध्ये त्यावेळी भरत होते. कॉलेजमधील मुलांना कॉलेज सोडून इतरत्र मुक्त संचार करता येऊ नये म्हणून कॉलेज प्रशासनाने काही निर्बंध घातले. कॉलेज इमारतीच्या पूर्वेचे प्रवेशद्वार बंद केले गेले. कॉलेजमधील मुलामुलींनी पश्चिमेकडील दरवाजाने इमारतीत यावे आणि तेथूनच बाहेर जावे हा दंडक मुलांच्यावर लादण्यात

आला. तरीही कॉलेजमधील मुलांना ताराराणी विद्यापीठाच्या आवारात जाणे-येणे बंद करणे संस्थापकांना जमण्यासारखे नव्हते आणि झालेही तसेच.

मुले पूर्वीप्रमाणे ताराराणी विद्यापीठाच्या आवारातील बागेत हिंडू लागली. काही वेळा हायस्कूलमधील मुलींची छेड काढल्याच्या तक्रारी येऊ लागल्या. मुलांना त्याबद्दल सांगून पाहिले. परंतु मुलांचे "म्हणणे" किर्ती कॉलेज हे ताराराणी विद्यापीठाचे कॉलेज असल्याने कॉलेजमधील मुले हीसुद्धा ताराराणी विद्यापीठाचीच मुले होत आणि म्हणून त्यांना ताराराणी विद्यापीठाच्या परिसरात कुठेही फिरण्या-वावरण्याची मुभा असणे योग्य आहे तो त्यांचा हक्क आहे."

कॉलेजमधील आणि हायस्कूलमधील मुलींच्या पालकांची तक्रार संस्थापक श्री. व्ही.टी. पाटील यांच्याकडे येऊ लागल्या. पालकांचे म्हणणे असे की, किर्ती कॉलेज हे मुलींचे कॉलेज आणि ताराराणी विद्यापीठ ही सर्वस्वी स्त्री शिक्षण संस्था म्हणून आपल्या मुलींनी प्रवेश घेतला असल्याने ताराराणी विद्यापीठाच्या परिसरात मुलांचा मुक्त संचार हा मुलींच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने धोक्याचा होतो आहे.

एका अर्थी पालकांचे म्हणणेही बरोबर होते आणि दुसऱ्या अर्थी किर्ती कॉलेजची मुलेही ताराराणी विद्यापीठाचीच मुले (विद्यार्थी) असल्याने विद्यापीठाच्या परिसरात मुक्त संचार करण्याचा त्यांचा दावा संस्थापकांना अमान्य करण्यासारखा नव्हता. या कटकटीतून बाहेर पडण्याचा मार्ग संस्थापक शोधू लागले. कॉलेजची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी कॉलेजमध्ये मुलांना प्रवेश द्यावयाचे धोरण अवलंबिल्याचे दुःख व्ही. टी. पाटील यांना झाले. त्यांनी हा निर्णय घ्यायला नको होता असे त्यांना वाटू लागले. या निर्णयामुळे कॉलेजमधील पुरूष विद्यार्थी नाराज झाले व तसेच ताराराणी विद्यापीठातील मुलींचे पालकही संस्थेवर रूष्ठ झाले.

या आगतीकतेतून बाहेर पडण्याचा निर्णय श्री. व्ही.टी. पाटील यांनी घेतला तो म्हणजे सदरचे हे संमिश्र कॉलेज दुसऱ्या कुठल्यातरी नामवंत संस्थेला चालवावयास देऊन ताराराणी विद्यापीठाचा सर्व परिसर फक्त स्त्रियांसाठीच व स्त्री जीवनाच्या विकासासाठीच संरक्षित असा ठेवणे.[४८]

याच सुमारास महाराष्ट्रातील आणि भारतातील शिक्षणाच्या सर्वच स्तरांवर काम करणारी रयत शिक्षण संस्था ही संस्था कार्यरत होती. रयत शिक्षण संस्थेला कोल्हापूरमध्ये स्वतःचे कॉलेज हवे होते. त्याचप्रमाणे कोल्हापूरमधील जनतेलाही कर्मवीर भाऊराव पाटील यांनी काढलेल्या संस्थेची एखादी शाखा कोल्हापूरमध्ये असावी असे वाटत होते. करवीरवासियांची ही भावना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांपर्यंत पोहचली आणि संस्थेने पुणे विद्यापीठाकडे नवीन कॉलेज मागणीसाठी अर्ज सादर केला. पुणे विद्यापीठाने स्थानिक चौकशी समितीची नियुक्ती केली आणि समिती येणार असल्याची माहिती श्री. बी. बी. पाटील यांना मिळाली. श्री. बी. बी. पाटील त्यावेळी कोल्हापूर नगरपालिकेचे सभासद होते. त्यांचे मित्र श्री. पां. पि. पोवार हे नगराध्यक्ष होते. श्री. बी. बी. पाटील हे कोल्हापूर जिल्ह्यातील नगरपालिकांचा प्रतिनिधी म्हणून १९५४ ते १९५९ या पाच वर्षासाठी पुणे विद्यापीठाच्या सिनेटचे सभासद म्हणून निवडून गेले हाते. त्याचवेळी कर्मवीर भाऊराव पाटील हेसुद्धा सिनेटचे सभासद होते. सिनेटच्या मिटींगवेळी भाऊराव पाटील व बी. बी. पाटील यांच्यामध्ये सतत भेटी होत असत. कोल्हापूरमध्ये रयत शिक्षण संस्थेचे एखादे कॉलेज असावे ही इच्छा भाऊराव पाटील यांनी श्री. बी. बी. पाटील यांच्यासमोर अनेकवेळा व्यक्त केली होती.

पुणे विद्यापीठाची स्थानिक चौकशी समिती येणार म्हणून करवीरनगरीतील रयत हितचिंतकांनी नगरपालिकेची बैठक बोलावून या नियोजित कॉलेजची माहिती

दिली. स्थानिक चौकशी समितीला जागा दाखविणे आवश्यक होते. त्याशिवाय त्याची शिफारस मिळणे अशक्य हाते. अशा अडचणीवेळी ति. आण्णांचे बंधू व कोल्हापूर उद्यमनगरीच्या शिल्पकारांपैकी एक श्री. एस. ए. पाटील पुढे आले. त्यांनी आपली शाहुपूरीतील तीनमजली इमारत दाखविण्याची सोय केली. त्यामध्ये तळघरात प्रयोगशाळा व दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर वर्गांची सोय करून देण्याचे अभिवचन दिले. स्थानिक चौकशी समितीस श्री. एस. ए. पाटील यांची इमारत व अन्य एक दोन इमारती दाखविल्या. चौकशी समितीने श्री. एस. ए. पाटील यांची इमारत पसंत केली. करवीरमधील लोकांचा पाठींबा दाखवून दिला व तशी शिफारस विद्यापीठाकडे सादर केली. परंतु कोल्हापूरातील एका मातब्बर शिक्षण संस्थेने या महाविद्यालास विरोध केला. त्यामुळे पुणे विद्यापीठाची मान्यता मिळाली नाही.

या दरम्यान ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक मा. श्री. व्ही. टी. पाटील यांनी किर्ती कॉलेज एखाद्या नामवंत शिक्षण संस्थेस देण्याचा निर्णय घेतला होता. बॅरिस्टर पी. जी. पाटील व व्ही. टी. पाटील यांचे खास असे स्नेहसंबंध होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावरील निष्ठा व रयत शिक्षण संस्थेवरील प्रेमापोटी किर्ती कॉलेज रयत शिक्षण संस्थेला देण्याचा निर्णय श्री. व्ही. टी. पाटील यांनी घेतला. संस्थेचे चेअरमन श्री. रामभाऊ नलावडे, बॅ. पी. जी. पाटील, संघटक आप्पासाहेब पाटील, श्री. ए. डी. देसाई व श्री. बी. बी. पाटील यांनी यासंदर्भात बोलणी करून श्री. नाना भांद्रेकर (वकील) पुढारीकार गणपतराव जाधव यांचेशी चर्चा केली. त्यांनी यासंबंधी तोडगा काढला व तो श्री. व्ही. टी. पाटील व रयत शिक्षण संस्था यांनी मान्य केला आणि १९६७ साली किर्ती कॉलेजचे हस्तांतर रयत शिक्षण संस्थेकडे झाले. पहिले प्राचार्य म्हणून पी. जी. पाटील यांच्या नावाचा काही मंडळींनी संस्थेकडे आग्रह धरला आणि तो मान्यही झाला. बॅ. पी. जी. पाटील यांच्या अधिपत्याखाली 'किर्ती कॉलेज' या

नावाने ताराराणी विद्यापीठाच्या इमारतीतच कॉलेज सुरू झाले. ति. आण्णांची स्वप्नपुर्ती त्यांच्या निर्वाणानंतर आठ वर्षांनी झाली.

रयत शिक्षण संस्थेची एक शाखा राजर्षी शाहू महाराजांच्या नगरीत रूजू लागली. शाखेच्या संगोपनाची जबाबदारी शाखा प्रमुखांबरोबर स्थानिक कार्यकर्त्यांवर येऊन पडली. ताराराणी विद्यापीठाची जागा वापरण्यास फक्त दोन वर्षांसाठी मिळाली होती. त्यामुळे अन्यत्र हे कॉलेज हालवावे लागणार आहे याची जाणीव संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना होती. त्यामुळे त्यांनी जागेची शोधाशोध चालू केली हाती. संस्थेचे चेअरमन श्री. रामभाऊ नलावडे व स्थानिक कार्यकर्त्यांनी कोल्हापूर शहर व परिसरात सरकारी जागा व पूर्वीच्या संस्थानिक व सरदारांचे बंगले पाहण्याचा सपाटा चालू केला. दोन वर्षांची जागेची मुदत संपली. अशा वेळी प्रिन्स शिवाजी बोर्डींगचे पदाधिकारी (श्री. भोसले, श्री. दामोदर माने, श्री. रेंदाळकर, श्री. पी. जी. माने, श्री. नलावडे) व महाराष्ट्र हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. डी. बी. पाटील यांनी मदतीचा हात पुढे केला. महाराष्ट्र हायस्कूलच्या इमारतीत किर्ती कॉलेजचे स्थलांतर करण्यात आले. श्री. आर. डी. गायकवाड हे प्राचार्य म्हणून रूजू झाले. कायमची जागा शोधण्याचे प्रयत्न सुरू होते. संस्थेचे संघटक श्री. आप्पासाहेब पाटील व स्थानिक कार्यकर्ते श्री. बी. बी. पाटील हे कोल्हापूरातील राजेश मोटर्सचे भागीदार श्री. रसिकभाई शहा यांच्या बंगल्यावर गेले असता कॉलेजच्या जागेचा विषय चर्चेस निघाला. लागलीच शहा यांनी पाऊनशे एकर सरकारी जागेची माहिती दिली. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मुलकी खात्याकडून या जागेची माहिती घेतली. त्यावेळचे महसूलमंत्री बाळासाहेब देसाई यांच्याकडे संस्थेने जागेची मागणी केली. मागणीचा पाठपुरावा आ. एन. डी. पाटील यांनी करून संस्थेला तीन एकर जागा मंजूर करून घेतली. जागेच्या कब्जासाठी/ कब्जेपट्टीसाठी येथील सिव्टी सर्व्हे ऑफिसर श्री. बाबा पेटकर यांचेसमवेत

श्री. बी. बी. पाटील, स्थानिक कार्यकर्ते व मा. चंद्रकांत पाटगावकर विचारे माळावर गेले. श्री. बाबा पेटकर हे एक उत्तम प्रशासनाधिकारी होते. त्यानी तेथील अडचणी समजावून सांगताच त्यांनी कब्जेपट्टीचे काम पुरे करून दिले. जागेवरील परिस्थिती अत्यंत घाणेरडी होती. या घाणेरड्या जागेची स्वच्छता करवून झटपट इमारत कशी पुरी होईल या दृष्टीने प्रयत्न झाले आणि अलपावधीत इमारत पूर्ण झाली आणि १९७१ साली कॉलेजचे स्वतःच्या जागेत स्थलांतर झाले.[४९] महाराष्ट्राचे त्यावेळचे महसूलमंत्री मा. बाळासाहेब यांच्या शुभहस्ते सरकारकडून मिळालेल्या जागेवर इमारतीचा भूमिपूजन समारंभ दि. २२/६/१९६९ रोजी झाला.[५०]

प्रा. एन. डी. पाटील यांच्या प्रयत्नामुळे ही जागा शासनाकडून संस्थेला मिळाली. रयत शिक्षण संस्थेने दि. २६-२-१९६९ रोजी ठराव करून संस्थेच्या सर्व शाखातील सेवकांचे दोन दिवसांचे वेतन या महाविद्यालयाच्या इमारतीसाठी दिले. या कॉलेजमध्ये असलेल्या सर्व स्टाफनेही आपला एक महिन्याचा संपूर्ण पगार दिला आणि कॉलेजची वास्तू १९७१ मे पूर्वी कराडच्या कोटणीस यांच्या न्यू ट्रीओ बिल्डर्सनी उभी केली. राजर्षी शाहूंच्या नगरीत कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण झाले, त्या नगरीत कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेचे महाविद्यालय स्वतःच्या इमारतीत भरू लागले.

**नामांतर -**

ताराराणी विद्यापीठाच्या कारकिर्दीत डॉ. उषा इथापे (१९६१-६४) व श्री. एम. डी. देशपांडे (१९६४-६७) यांनी प्राचार्यपद भूषविले. रयत शिक्षण संस्थेकडे कॉलेज आल्यानंतर पहिले प्राचार्य म्हणून बॅ. पी. जी. पाटील यांनी सुत्रे हाती घेतली. १९६९ मध्ये श्री. आर. डी. गायकवाड हे प्राचार्य म्हणून रूजू झाले. त्याच्या कारकिर्दीत कॉलेजचे नामांतर "राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज" असे करण्यात आले. कर्मवीर भाऊराव पाटील यांची इच्छा होती की राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाचे

एखादे महाविद्यालय कोल्हापूरमध्ये असावे. या कॉलेजद्वारे ति. आण्णांची इच्छापूर्ती झाली.[५१]

**मूल्यमापन -**

ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या आणि निसर्गसौंदर्याने नटलेल्या कोल्हापूर या नगरीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे महान राजे होऊन गेले. शाहू महाराजांच्या दूरदृष्टीपूर्ण विविध धोरणांमुळे कोल्हापूरचा कायापालट झाला. शाहू महाराजांनी विविध शैक्षणिक धोरणे अवलंबिली व समाजातील सर्व जातीधर्मातील लोकांसाठी शिक्षणाची दारे उघडी केली. गोरगरीबांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांच्यासाठी मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. याच काळात कर्मवीर भाऊराव पाटील यांचा संबंध शाहू महाराजांशी आला. शाहू महाराजांनी शिक्षण प्रसारासाठी बांधलेल्या जैन बोर्डिंगमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील वास्तव्यास होते. येथे असताना भाऊराव प्रत्यक्ष शाहू महाराजांना भेटत असत. शाहू महाराजांना असलेली गोरगरीबांच्या शिक्षणाविषयीची कळकळ भाऊरावांनी जवळून पाहिली. शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव भाऊरावांवर पडला. नंतरच्या काळामध्ये शाहू महाराजांच्या कार्याची धूरा भाऊराव पाटील यांनी सांभाळली. भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कार्य पुढे नेले. पण त्यासाठी विद्यार्थ्यांनी परावलंबनाने नव्हे तर स्वावलंबनाने शिक्षण घ्यावे हा मूलमंत्र सदैव अंगिकारला. रयत शिक्षण संस्थेचा विकास संपूर्ण महाराष्ट्रभर झाला. भाऊराव पाटील शाहू महाराजांना आपले गुरू मानित व या गुरूभूमीमध्ये आपल्या गुरूंच्या नावाने एखादे महाविद्यालय असावे अशी भाऊरावांची इच्छा होती. कोल्हापूरमध्ये रयत शिक्षण संस्थेचे 'राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय' हे महाविद्यालय सुरू झाले व भाऊरावांची स्वप्नपूर्ती झाली. आज हे महाविद्यालय कोल्हापूर शहरातीलच नव्हे तर शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एक नाविन्यपूर्ण महाविद्यालय ठरले आहे.

## संदर्भ सूची


१. पवार. बा. ग. 'ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक, कर्मवीर भाऊराव पाटील', मातृभूमी प्रकाशन, पुणे, १९८७, पृ. क्र. ३४.

२. पवार. बा. ग., कित्ता, पृ. ४१.

३. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ३८.

४. बॅ. पी. जी. पाटील, 'कर्मविरोपनिषद : कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या आठवणी', सातारा, १९८९, पृ. क्र. ५.

५. पवार. बा. ग., उपरोक्त, पृ. क्र. ४३.

६. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ४५.

७. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ४९.

८. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ५१.

९. पाटील. बॅ. पी. जी., उपरोक्त, पृ. क्र. ४.

१०. पवार. बा. ग., उपरोक्त, पृ. क्र. ५२.

११. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ६२.

१२. पाटील. बॅ. पी. जी., उपरोक्त, पृ. क्र. ६.

१३. कित्ता, पृ. क्र. ३.

१४. पवार. बा. ग., उपरोक्त, पृ. क्र. ९६.

१५. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ११७.

१६. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ९७.

१७. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ९८.

१८. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. ९९.

१९. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. १००.

२०. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. १०१.

२१. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. १५४.

२२. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. १२३.

२३. पवार. बा. ग., कित्ता, पृ. क्र. १२४.

२४. रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल - २००४-०५.

२५. रयत शिक्षण संस्था वार्षिक अहवाल - २००७-०८, पृ.क्र. १७.

२६. कित्ता, पृ. क्र. १९.

२७. कित्ता, पृ. क्र. १७.

२८. कित्ता, पृ. क्र. १७.

२९. कित्ता, पृ. क्र. १७.

३०. पवार. बा. ग., उपरोक्त, पृ. क्र. ३०६.

३१. उपरोक्त, पृ. क्र. १८७.

३२. रौप्यमहोत्सवी स्मरणिका (रयत शिक्षण संस्थेचे राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर) १९८५-८६ लेख- शिक्षण तिर्थकार व रयत शिक्षण संस्था, प्रा. श्रीधर हेरवाड

३३. राजर्षी विज्ञान शाखा स्मरणिका १९९५-९६, लेख- थोडसं हितगुज, प्राचार्य मा. के. यादव.

३४. Magdum. V. Y., Ph.D. Thesis, 'History of Kolhapur City (1949-1990) A Socio-Economic Study', P. 1.

३५. Magdum. V. Y., Ibid., P. 1.

३६. Magdum.V. Y., Ibid., P. 2.

३७. Magdum. V. Y., Ibid., P. 3.

३८. Magdum. V. Y., Ibid., P. 3.

३९. Magdum. V. Y., Ibid., P. 20.

४०. Magdum. V. Y., Ibid., P. 21.

४१. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय (कोल्हापूर) रौप्यमहोत्सव स्मरणिका (१९८६-८७) लेख- राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व कार्य, डॉ. विलास संगवे.

४२. Magdum. V. Y., Ibid., P. 213.

४३. Magdum. V. Y., Ibid., P. 214.

४४. Magdum. V. Y., Ibid., P. 215.

४५. Magdum. V. Y., Ibid., P. 216.

४६. Magdum. V. Y., Ibid., P. 217.

४७. Magdum. V. Y., Ibid., P. 219.

४८. रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९८६-८७) उपरोक्त, लेख - शाहू कॉलेज, पूर्वाश्रमीच्या किर्ती कॉलेजचा जीवन इतिहास श्री. व्ही. टी. पाटील (संस्थापक अध्यक्ष- ताराराणी विद्यापीठ, मौनी विद्यापीठ).

४९. रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९८६-८७), लेख - राजर्षी शाहू महाविद्यालय आणांची स्वप्नपूर्ती - बी. बी. पाटील.

४९. रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९८६-८७), लेख - राजर्षी शाहू महाविद्यालय आण्णांची स्वप्नपूर्ती - बी. बी. पाटील.

५०. रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९८६-८७), लेख - आमची २५ वर्षांची वाटचाल-
प्रा. चंद्रकांत पाटगावकर.

५१. रौप्यमहोत्सवी स्मरणिका (१९८६-८७) - कित्ता.

❑❑❑